अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २७ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८



# ‘वजन’ वाढले, पण...

केंद्रात भारतीय जनता पक्षाला तिसऱ्यांदा सत्ता मिळवून द्यायचीच नाही, या इराद्याने विरोधी पक्ष एकत्र आले असून नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली पाटण्यात नुकतीच जी बैठक झाली, तिला १५ पक्षांचे अध्यक्ष उपस्थित होते. विशेष म्हणजे काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि भाजपला धोबीपछाड करणारे राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव हेही उपस्थित होते. भाजपविरोधात आघाडी करण्याचा एक भाग म्हणून विरोधकांच्या महाआघाडीची दुसरी बैठक जुलैच्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात सिमल्यामध्ये होणार असून तिच्या आयोजनाची सर्व जबाबदारी काँग्रेसकडे देण्यात आली आहे. दुसऱ्या बैठकीत भाजपविरोधातील लढाईचे सूत्र निश्चित होणार असल्याने इतर भाजपेतर पक्षांप्रमाणे काँग्रेससाठीही महत्त्वाची असेल. पाटण्यातील बैठकीत जागावाटपाबाबत राहुल गांधींनी तडजोड करण्याची तयारी पाहता महाआघाडीत हळूहळू काँग्रेस केंद्रस्थानी येत असल्याचे संकेत मिळू लागले आहेत. पाटण्यातील बैठकीनंतर पत्रकार परिषदेमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंच्या आधी राहुल गांधींना नितीशकुमार यांनी बोलण्याचा आग्रह केला होता. ‘तुम्ही बोला, ते अधिक बरे होईल’, असे नितीशकुमार यांनी राहुल गांधींना म्हणाले. खरगेंच्या मान राखत राहुल यांनी पक्षाध्यक्षांना बोलू दिले. लालूप्रसाद वा नितीशकुमार यांच्या वागण्यामध्ये राजकीय अर्थ काढण्याची गरज नसली तरी, बैठकीमध्ये काँग्रेसने विरोधकांच्या ऐक्यासाठी जागांबाबत दाखवलेली लवचिकता महाआघाडीच्या बैठकीसाठी प्रोत्साहन देणारी ठरली. काँग्रेसची सत्ता असलेल्या हिमाचल प्रदेशमध्ये दुसरी बैठक



होणार असून त्यासाठी तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी होकार दिला. पहिली बैठक दिल्लीतच होणार होती पण, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी जाणीवपूर्वक पाटण्यात घेण्याचा आग्रह नितीशकुमारांना केला होता. दिल्लीत बैठक घेणे म्हणजे काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारणे असा अर्थ निघाला असता. पाटण्याच्या बैठकीची तडजोड काँग्रेसनेही मान्य केली! सिमल्यातील बैठकीत जागावाटपचे सूत्र ठरवताना भाजपशी थेट लढाई असलेल्या उत्तरेतील दोनशेहून अधिक जागा काँग्रेसलाच दिल्या जातील. तिथे प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वा अस्तित्व नाही. पण, उर्वरित ३०० जागांपैकी काँग्रेस किती जागा लढवेल, यावर एकास एक उमेदवाराचे सूत्र किती यशस्वी होईल हे ठरेल. शिवाय भाजपविरोधातील अजेंडा निश्चित करावा लागणार आहे. त्यामध्ये मोदींवर थेट हल्लाबोल करण्यापेक्षा कर्नाटक निवडणुकीतील प्रचाराचा कित्ता गिरवणे योग्य ठरू शकेल. त्यादृष्टीने किमान समान कार्यक्रम निश्चित केला जाऊ शकेल. महाआघाडीतील घटक पक्षांमध्ये वाद झाला तर तंटा निवारण समितीही स्थापन केली जाण्याची शक्यता आहे. त्याशिवाय, वरिष्ठ नेत्यांचा समावेश असलेली समन्वय समितीही स्थापन केली जाऊ शकेल. दक्षिणेकडील राज्यांमध्ये तामिळनाडूमध्ये द्रमुकला काँग्रेससाठी काही जागा सोडाव्या लागतील. कर्नाटकमध्ये काँग्रेस थेट भाजपविरोधात लढेल. तेलंगणा, आंध्रप्रदेशमध्ये भाजप कमजोर असला तरी, काँग्रेसला भारत राष्ट्र समिती, वायएसआर काँग्रेस व तेलुगू देसम यांच्याशी लढावे लागेल. महाराष्ट्र, तामिळनाडू, झारखंड, बिहार वगैरे काही राज्यांमध्ये काँग्रेसची आघाडी आहे, तिथे राज्यस्तरावर जागावाटपाचा प्रश्न सोडवता येऊ शकतो. उत्तर प्रदेश व पश्चिम बंगालमध्ये कदाचित अधिकृतपणे महाआघाडी होण्याची शक्यता नाही. या दोन राज्यात छुपी आघाडी केली जाऊ शकते. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्षाला काँग्रेससाठी काही मतदारसंघ सोडावे लागतील. तिथे सपचा उमेदवार नसेल. हेच सूत्र पश्चिम बंगालमध्ये राबवले जाऊ शकते. काँग्रेस-माकप आघाडीसाठी त्यांचा प्रभाव असलेल्या मालदा व मुर्शिदाबाद या जिल्ह्यातील मतदारसंघ तृणमूल काँग्रेसला द्यावे लागतील. काँग्रेससाठी राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, दिल्ली, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये आम आदमी पक्ष त्रासदायक ठरू शकतो. काँग्रेसला काही मित्र पक्ष जोडावे लागतील.अन्यथा गुजरातप्रमाणे इतर राज्यांतही ‘आप’ भाजपचा फायदा करून देऊ शकेल.

राजकीय

# शिवसेना वर्धापन दिन मातोश्रीला भारी

**एकोणीस जून हा शिवसेनेचा स्थापना दिन. यंदा या पक्षाचा ५७वा वर्धापन दिन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा सेनेने आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने मुंबईत दोन वेगवेगळ्या ठिकाणी साजरा केला. ठाकरे सेनेचा वर्धापन दिन शीव येथील षण्मुखानंद सभागृहात, तर शिवसेनेचा वर्धापन दिन गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये साजरा झाला. शिवसेनेच्या वर्धापन दिनाला मंत्र्यांची आणि नेत्यांची मांदियाळी व्यासपीठावर होती. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे याचा रुबाब आणि भाषा मातोश्रीला आव्हान देणारी होती. शिवसेना विस्ताराचा त्यांनी ध्यास घेतला आहे, असे त्यांच्या भाषणातून जाणवत होते. मुख्यमंत्री व शिवसेनेचे सर्वोच्च नेते अशा दोन्ही भूमिकांतून ते वावरताना दिसले. उबाठा सेनेच्या वर्धापन दिनाला व्यासपीठावर नेते, उपनेत्यांची रांग होती. पण त्यातले अनेकजण स्वत:च्या भविष्याबाबत चिंतेत असल्याचे दिसत होते. वर्ष उलटले तरी पक्षप्रमुख अजूनही एकनाथ शिंदे व त्यांच्या चमूला गद्दार म्हणून हिणवत आहेत. उबाठाच्या कार्यक्रमात उसने अवसान आणून घोषणा दिल्या जात होत्या, तर शिवसेनेच्या कार्यक्रमात जोश आणि होश बघायला मिळाला. षण्मुखानंदला सत्ता गमावलेल्या लोकांची उपस्थिती होती, तर नेस्को सेंटरला शिवसैनिकांचा दांडगा उत्साह दिसून आला.**

गेल्या वर्षी वीस जूनला एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला व सहकारी आमदारांसह सूरतमार्गे गुवाहाटीला कूच केले. शिवसेनेचे चाळीस आणि दहा अपक्ष अशा पन्नास आमदारांच्या ताकदीवर शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदालाच थेट आव्हान दिले. आपला पक्ष हीच खरी शिवसेना असा दावा केला. ठाकरे बहुमताच्या परीक्षेला सामोरे न जाताच वर्षावरून मातोश्रीवर परतले. ठाकरे गेले आणि भाजप-शिवसेना युतीचे सरकार स्थापन झाले. शिंदे मुख्यमंत्री व फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. निवडणूक आयोगानेही शिंदे यांची भूमिका मान्य करून त्यांच्या पक्षाला शिवसेना म्हणून मान्यता दिली आणि धनुष्यबाण हे शिवसेनेचे निवडणूक चिन्हही बहाल केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर कायम राहिले. शिवसेनेच्या सोळा आमदारांवरील कारवाई करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांवर सोपवला आहे. तो अद्याप प्रलंबित आहे. एवढ्या सर्व घडामोडींनंतर एका पक्षाचे दोन वर्धापन दिन साजरे झाले व दोन्ही कार्यक्रमांत एकमेकांवर आसूड ओढले गेले. शिंदे आणि ठाकरे हे एकमेकांचे किती राजकीय कट्टर दुश्मन झाले आहेत, याचेच दर्शन या वर्धापन दिनाला घडले. ठाकरे यांचे मुख्यमंत्रिपद गेले, सरकार गेले, शिवसेनेत उभी फूट पडून मोठे-मोठे दिग्गज नेते त्यांना सोडून गेले. वर्षभरात झालेले नुकसान भरून काढणेही अशक्य होऊन बसले. सरकार गेले, पक्षाचे नाव गेले, चिन्ह गेले आणि रोज कुणी ना कुणी पक्ष सोडून शिंदेंच्या शिवसेनेत जातच आहे.

मुख्यमंत्रिपद मिळाले आणि जोडीला पक्षाचे नाव व चिन्ह मिळाले म्हणजे सर्व काही मिळाले असे शिंदे यांना समजता येणार नाही. पक्षबांधणीचे फार मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. शिवसेना ही केवळ मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवलीपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही. जे चाळीस आमदार व तेरा खासदार शिंदेंच्या शिवसेनेत आलेत, त्यांच्या मतदारसंघांत काय परिस्थिती आहे याचे वास्तव चित्र समजावून घेऊन उपाय योजले पाहिजेत. उबाठा सेनेतील अनेक मोठे नेते शिंदेंबरोबर आले. पण सामान्य शिवसैनिक किती आले आहेत व सामान्य जनतेला काय वाटते, याचे भान पक्ष संघटनेचा विस्तार करताना ठेवले पाहिजे. ३६५ दिवस २४ तास, शिवसेना एकच ध्यास’ अशा घोषणा वर्धापन दिनाला सर्वत्र फलकांवर झळकत होत्या. केवळ शिंदे यांच्या पुढे-मागे धावणारे नेते असतील, तर शिवसेना वाढणार नाही, लोकांना उपलब्ध असणारे व लोकांचे प्रश्न ऐकून त्यांची काम करणारे नेते हवे आहेत. तुलनेने शिंदे यांच्याकडे शाखांची संख्या खूपच कमी आहे. शाखांचे जाळे उभारण्यास वेळ लागणार, तोपर्यंत जनसंपर्क कसा ठेवणार? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो शिंदे व ठाकरे या दोघांच्या पक्षाच्या फलकावर दिसतात. शिवसैनिकांचे आजही श्रद्धास्थान शिवसेनाप्रमुख आहेत. शिंदे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांच्याभोवती प्रसिद्धीचे वलय आहे. पण जनतेकडे मते मागण्यासाठी शिंदे यांना नेत्यांची फळी उभी करावी लागेल. त्यांच्याकडील काही नेते त्यांच्या मतदारसंघापुरते मोठे असतील, पण राज्यपातळीवर प्रचार करणारे व फिरणारे असे कोण आहेत? संघटना बांधणीचे फार मोठे आव्हान शिंदे यांच्यापुढे आहे.





उद्धव ठाकरे हे सत्तेवरून पायउतार झाल्यावर त्यांना पाहण्यासाठी व त्यांचे भाषण ऐकण्यासाठी लोकांची सुरुवातीला गर्दी होत होती. पण त्यांचा टीकेचा रोख हा एकनाथ शिंदे व त्यांचे सहकारी यांच्याकडेच होता व आजही आहे. गद्दार आणि खोकी अशी तीच ती टीका, तेच भावनिक आवाहन, वडील चोरायला निघाल्याचा आरोप, मिंधे सरकार म्हणून रोज हिणवणे याला लोकही कंटाळले व दिवसेंदिवस क्रेझ कमी होऊ लागली. एकनाथ शिंदे हे कुशल संघटक आहेत. गर्दी जमविण्यातही ते माहीर आहेत. पण या गर्दीचे रूपांतर मतांमध्ये करण्यासाठी त्यांना खूप प्रयत्न करावे लागणार आहेत.

भाजपसारखा राष्ट्रीय पक्ष एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी भक्कम उभा आहे. राज्यातून फडणवीस-बावनकुळे यांची शिंदे यांना साथ आहे. केंद्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आशीर्वाद आहेत. पण शिंदे निवडणुकीच्या राजकारणात आपल्या संख्याबळाची ताकद सिद्ध करू शकले नाहीत, तर शिवसेनेचे महत्त्व कमी होण्याचा धोका आहे. म्हणूनच संख्याबळाची शक्ती कायम ठेवणे व वाढविणे हे मोठे आव्हान शिंदे यांच्यासमोर आहे. ठाकरे यांचा पक्ष यापूर्वीही अनेकदा फुटला. नारायण राणे, छगन भुजबळ, राज ठाकरे, गणेश नाईक असे दिग्गज पक्ष सोडून गेले. पण गेल्या वर्षी पक्षात जो मोठा उठाव झाला, त्याने प्रचंड नुकसान झाले. कार्यकर्ते सांभाळणारे, कार्यक्रम-सभा-मेळावे-इव्हेंट योजणारे ६० मोठे नेते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेले. ही पोकळी भरून काढणे ठाकरे यांना अजून शक्य झालेले नाही. उबाठा सेनेकडे आज विधानसभेतील १६ आमदार व लोकसभेतील ५ खासदार उरले आहेत. यापुढे काँग्रेस व राष्ट्रवादीशी समझोता करून ठाकरेंना आणि भाजपचा हात धरून शिंदेंना पुढील वाटचाल करावी लागणार आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

टुडेज् ब्लॉग

# जगण्याचा श्वास, वडील...

**सारं घर रडून मोकळं होतं आईच्या कुशीवर,**
**पण रात्री आभाळ रिकामं होतं ते फक्त**
**वडिलांच्या उशीवर..!**

‘वडील’ म्हणजे कुतूहलाचं एक नाव आणि सुखी-समाधानाच्या आयुष्याला मिळालेला एक परीस! खरंतर वडील त्यांचा प्रत्येक क्षण आपल्या मुला-मुलींसाठी देतात. आनंदाच्या, दु:खाच्या प्रसंगी साथसुद्धा देतात. प्रेरणा तर वडिलांना बघताच मिळते, मग का त्यांना गरज असताना आजच्या पिढीच्या मुलांचे क्षण व्यस्त असतात? आनंदाच तर सोडाच, दु:खाच्या प्रसंगी का त्यांची साथ द्यायला आजच्या पिढीचे हात नसतात? खरंच ही किती दुर्दैवाची बाब नाही का? जीवन जगण्याविषयी प्रश्नचिन्ह तर आहेच, पण प्रत्येकाची प्रेरणा असलेले ‘आपले वडील’ असल्यानंतर त्यांच्याही बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण होते. मग जे आपली प्रेरणा आहेत, त्यांच्यासाठी या गोष्टी होत असतील तर नवलच नाही का? खरंतर आजची मुलं काय जगणार आणि इतरांना काय जगवणार? ‘वडील’ प्रत्येक मुलांच्या शब्दांत बसण्याइतके छोटेही नाही आहेत आणि त्यांना शब्दांत बसवण्याइतका कोणता मुलगाही मोठा नाही.

पण आधार नसलेल्या हाताला आधार कुणी द्यावा आणि वडील म्हातारे झाले म्हणून त्यांना वृद्धाश्रमात का न्यावा? बस्स एवढेच..! वडिलांच्या जिवावर मुलं शिकतात, मोठी होतात, कालांतराने पुढे जातात आणि मग त्यांनाच म्हणतात, ‘तुमच्यापेक्षा आम्ही कर्तृत्ववान आहोत! वडिलांनी काय नाही केले आपल्या मुलांच्या बनियनला भोकं पडू नये यासाठी. अगदी स्वत:च्या बनियनची भोकंसुद्धा वडील विसरले. स्वत:च्या रक्ताचं पाणी करून आपल्या मुलांची तहान भागवली, दिवसभराच्या उन्हाला शरीराचा सोबती मानून दिस-दिस राबराबले. कामावरून घरी जाताना आपल्या चिमुकल्याच्या आलिंगनाची आस धरून जगले.’

लाडक्या लेकरासाठी एटीएम भरतं राहावं म्हणून रात्र-रात्र जागून काम केले. मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वत:ची स्वप्न विसरून गेले. समुद्रामधील जहाज बनून पाण्यात न भिजवता किनाऱ्याला नेले. अपरिमित कष्ट करणारं शरीर, अपरिमित काळजी करणारं मन आपल्या मुलांसाठी ठेवले. डोळ्यात न दाखवताही आभाळाएवढं प्रेम करून बाप नावाचा ‘राजा माणूस’ झाले. शेवटी पूर्ण घर शोधून थकलो, पण कुणास ठाऊक वडिलांनी त्यांची आभाळभर सोडलेली दु:खं कुठल्या कोपऱ्यात नेऊन ठेवली होती. असंख्य दु:ख मनात ठेवून नेहमी हास्याचा मुखवटा घालून बहुरूपी होऊन बाजारात प्रत्येक मुला-मुलींचे वडील फिरले.

जगात वडीलच एकमेव व्यक्तिमत्त्व असे होते की, ज्यांच्या सावलीत असंख्य मुला-मुलींनी राज्य केलं. आपल्या मुलींसाठी तर ते नेहमी जादूमयसारखे झाले. तिच्या लग्नाच्या दिवशी स्वत:चे अश्रू लपवत फिरले. आपल्या मुलाचं भविष्य चांगलं असावं म्हणून वडिलांना कधी कधी झोपसुद्धा लागली नाही. वडील देव नाहीत, पण देवापेक्षाही फार ग्रेट आहेत. कारण देव तर सुख-दु:ख दोन्ही देतो, पण वडिलांनी तर नेहमी फक्त सुखच दिले. आजही ते दिवस, तो फरक आठवतो. लहानपणी वडील झोपताना एखादी गोष्ट सांगून एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जायचे. २० रुपये वाचावे म्हणून वडील २० मिनिटे चालायचे आणि आपल्या मुलाचे २० मिनिटे वाचावे म्हणून २० रुपये मुलं आनंदाने खर्च करायची.

वडील जेव्हा स्वार्थी जीवनाला नाकारून वीतभर पोटासाठी अन् जगभराच्या पिटाऱ्यासाठी झगडला ना, तेव्हा पायात रुतलेला काटा पण मऊ



कापसासारखा आणि ओघाळलेलं रक्त आयुष्याला मिळालेल्या अमृतासम वाटलं. जगलो आम्ही स्वत:च्या जिवावर हा फक्त आजच्या पिढीतील मुलांचा भ्रम आहे. खरंतर वडिलांनीच प्रत्येक मुलाला जगवलं आणि कष्टानं खायला शिकवलं.

वडिलांनी आपल्या मुलांसाठी काय केलं आणि वडील आपल्यासाठी (मुलांसाठी) काय आहात याची जाणीव, उणीव भासण्याआधीच मुलांना व्हायला हवी होती. खरंच वडील आजच्या पिढीतील मुलांना माफ करणार ना? शेवटी एकच वडील असेपर्यंत त्यांना जपा. त्यांना मिठी मारून घ्या. मग नंतर फक्त भास होत राहतो, त्याचा स्पर्श नाही.

**- आकाश महालपुरे.**

जन्म हा अखेरचा

# कायार्पितस्थल



शरीराभिमानाचा त्याग करणे हेच कायार्पण होय. शिवरुप झालेला, काया, इंद्रिये आणि प्राण यांच्यावर अनुग्रह करणारा शिवयोगी शिवार्चन करताना शरीराभिमानाचा त्याग करतो, तेव्हा त्याला ‘कायार्पितस्थल’ असे म्हणतात. गुरुपदेशानुसार जो साधक आपल्या कायेला शिवार्पित करतो त्याला ‘शैव’ म्हणतात. अशा साधकाला मुक्ती मिळते, त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही, असे ‘योगज आगमा’त सांगितले आहे. आपल्या देशात प्रत्येकाची इष्टदेवता वेगवेगळी असते. कोणी शिवाची, कोणी बुद्धाची तर कोणी ख्रिस्ताची उपासना करतात. त्यामुळे त्यामुळे शैवदर्शन, वीरशैवदर्शन, वैष्णवदर्शन, शक्तीदर्शन, गाणपत्यदर्शन, कापालिकदर्शन, जैनदर्शन, बौद्धदर्शन अशी अनेक दर्शने, तत्त्वज्ञाने निर्माण झाली. आम्ही पुन्हा पुन्हा सांगतो की, उपासनापद्धती आणि इष्टदेवतेची रुपे भिन्न असली तरी त्यामधून व्यक्त होणारे तत्त्व एकच आहे. एकाच मूलतत्त्वाला अनेकांनी अनेक रुपांत पाहिले आहे. अनेक नामांनी बोलाविले आहे. हे सत्य ध्यानी घेऊन सर्व उपासकांनी परस्परांच्या मतांचा आणि देवतांचा आदर केला पाहिजे.

‘शिव’ म्हणजे सर्वांना समान दृष्टीने पाहणारे, सर्वांचे कल्याण चिंतणारे परमतत्त्व होय. शिवानुभव हा मंगल अनुभव आहे. जो स्वत:ला शिवार्पित करतो तो शैव होय. शैवात तो ‘वीर’ असतो त्याला ‘वीरशैव’ म्हणतात. वीरशैव हा भक्तीक्षेत्रातील ‘वीर’ आहे. सामान्य शैव मंदिरात जाऊन शिवोपासना करतात. परंतु वीरशैव मात्र शरीरावर लिंग धारण करून आपल्या शरीराचेच मंदिर करतो. त्याचे शरीर इष्टलिंगापासून कधीही विभक्त होत नाही. शरीराचे मंदिर करण्याचे वीरत्व त्याच्या ठायी असल्यामुळे तो ‘वीरशैव’ ठरतो.


समर्पण का करावे लागते? तर जे ज्याचे आहे ते त्याला परत करण्यासाठी. शरीर भगवंताला समर्पित करायचे. शरीर कोणाचे आहे? शरीर मातापित्याचे आहे. माता-पित्याचे शरीर त्यांच्या माता-पित्यांचे आहे, असे मागे-मागे जात जो सर्वांचा माता-पिता आहे त्याच्याजवळ येऊन आपण थांबतो. ‘त्वमेव माता च पिता त्वमेव!’ सर्वांचा माता आणि पिता भगवंतच आहे. मनुष्यशरीर माणसाला प्रयोगशाळेत निर्माण करता येणार नाही. शरीर ही परमेश्वराची एक सुंदर कलाकृती आहे. हे अद्भूत शरीर यंत्र त्याने कसे निर्मिले कुणास ठाऊक! त्यासाठी कोणकोणती द्रव्ये वापरली हे त्यालाच माहीत. अस्थी, मज्जा, मांस, त्वचा आणि विलक्षण सामर्थ्यशाली मेंदू.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# भारत आणि अमेरिका मैत्री

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा भारत आणि अमेरिका मैत्री संबंधासाठी मैलाचा दगड ठरला आहे. भारत आणि अमेरिका हे जागतिक पटलावरील दोन अतिशय महत्वाचे देश आहेत. दोन्ही देश लोकशाहीचे पाईक आहेत. अमेरिका हा जगातील सर्वात जुनी लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे तर भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. त्या अनुषंगाने दोन्ही देशांमधील मैत्री लोकशाहीच्या भविष्यासाठी महत्वाची ठरणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा काही पहिलाच अमेरिका दौरा नाही. याआधीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका दौरा केला आहे मात्र, यावेळेचा दौरा विशेष आहे.कारण या दौऱ्याने भारत आणि अमेरिका मैत्री पर्वाच्या नव्या युगाची सुरुवात झाली आहे. या दौऱ्यात दोन्ही देशांकडून संरक्षण विषयक अनेक करार करण्यात आले. जनरल इलेक्ट्रिकचा हिंदुस्थान एरोनॉटिक्स सोबत लढाऊ विमानांसाठी जेट इंजिन बनवण्याचा महत्वपूर्ण करार आहे. २०२५ पूर्वी अमेरिका चंद्रावर माणूस पाठवण्याची मोहीम आखणार आहे. या मोहिमेत ते भारताला समाविष्ट करून



घेणार आहे. अमेरिका ही जागतिक महासत्ता आहे तर भारत ही वेगाने विकसित होणारी महासत्ता आहे. या दोन महासत्ता एकत्र आल्या तर चीनसारख्या महासत्तेला आव्हान देता येईल. या दौऱ्यामागचे खरे कारण हेच असण्याची शक्यता आहे. मागील दोन दशकात चीन अमेरिकेच्या वर्चस्वाला चीन आव्हान देत आहे. चीनचे हे आव्हान मोडून काढण्यासाठी अमेरिकेला भारताची सोबत हवी. कारण चीनला जशास तसे उत्तर देणारा आशिया खंडातील एकमेव देश म्हणजे भारत.

भारत आणि चीन यांच्यातील शत्रुत्व जगजाहीर आहे. भारत आणि अमेरिकेचा चीन हा समान शत्रू आहे. त्यामुळेच शत्रूचा शत्रू हा आपला मित्र या नात्याने हे दोन देश एकत्र आले आहेत कदाचित त्यामुळेच चीनचा तिळपापड होत आहे. चीनने पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यावर टीका केली आहे. पण दोन्ही देशांनी चीनच्या टिकेकडे दुर्लक्ष केले आहे. चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासाठी हा दौरा खूप महत्वाचा ठरणार आहे. मागील पंधरा वीस वर्षांत विशेषतः मनमोहनसिंग आणि बराक ओबामा यांच्या काळात सुरू झालेले मैत्री पर्व आज मोदी आणि बायडेन यांच्या काळात आणखी घट्ट झाले आहे. केवळ भारत आणि अमेरिकेसाठीच नव्हे तर जागतिक राजकारणासाठीही अत्यंत महत्वाची घडामोड आहे.

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

# वैष्णवांसाठी पालखीची पर्वणी

**विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन होऊन संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगाच्या तालावर टाळ, मृदंग यांच्या निनादात वारकरी फुगडी खेळत विविध खेळ खेळत आणि रिंगण करून अभंग म्हणत पालखी खांद्यावर आणि डोक्यावर घेऊन चालतात. दररोज थोडेफार अंतर अथवा काही मैल अंतर हे वारकरी चालत असतात. १५ ते १६ दिवस वारकरी हे अंतर चालत असतात. रात्रीच्या वेळी रस्त्यात लागलेल्या गावांमध्ये मुक्कामास थांबतात. जेथे यांचा मुक्काम होतो, त्या गावातील गावकरी मंडळी वारकऱ्यांसाठी जेवणाची, औषधांची, झोपण्याची व्यवस्था करीत असतात. यातून आपणास मोठे पुण्य मिळते असे समजले जाते.**

गुरुवार २९ जून रोजी देवशयनी आषाढी एकादशी असून ही वैष्णवांसाठी मोठी पर्वणीच समजली जाते. हिंदू धर्मात एकादशीच्या उपवासाचा मुख्य उद्देश म्हणजे मन आणि शारीरिक इंद्रियांवर नियंत्रण मिळवणे आणि ते आध्यात्मिक प्रगतीकडे वळवणे हा आहे. याव्यतिरिक्त उपवासाशी संबंधित अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. मन, इंद्रिये आणि शरीर शुद्ध करण्यासाठी या उपवासाकडे पाहिले जाते. आषाढी एकादशी, देवशयनी एकादशी ही हिंदू पंचांगातील एक अत्यंत महत्त्वाची तिथी आहे. वारकरी बांधव मोठ्या उत्साहात ही तिथी साजरी करतात. यालाच वारकरी सांप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव समजले जाते. वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे.



आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी, भक्तगण पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी आपली हजेरी लावतात.

आषाढी एकादशीच्या व्रतात अथवा उपवासात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते आणि सगळेच वैष्णव हा एकादशीचा उपवास करतात. म्हणून पुराणामध्ये या एकादशीला जास्त महत्त्व आहे. तसेच संपूर्ण वर्षभरात एकूण १४ एकादशी असतात, परंतु आषाढी आणि कार्तिकी एकादशीला जास्त महत्त्व दिले जाते. आषाढ महिन्यातील याच दिवशी चातुर्मास (चार महिन्यांचा काळ) सुरू होतो व कार्तिकी एकादशीला संपतो.

देवशयनी एकादशी म्हणजे- ‘देव’ म्हणजे देव आणि ‘शयनी’ म्हणजे झोपलेला, म्हणून ‘देवशयनी’ हे नाव या एकादशीसाठी आहे. असे म्हणतात की, श्री भगवान विष्णू याच दिवशी क्षीरसागरात शेषनागावर योगनिद्रेमध्ये जातात व त्यानंतर कार्तिकी एकादशीला बाहेर पडतात. मनुष्याचे एक वर्ष हे देवांचे एक अहोरात्र असते. ‘दक्षिणायन’ ही देवांची रात्र असून ‘उत्तरायण’ हा त्यांचा दिवस असतो. आषाढ महिन्यात येणाऱ्या कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होऊन दक्षिणायन सुरू होते, म्हणजेच देवांची रात्र सुरू होते म्हणून आषाढी एकादशीला ‘देवशयनी एकादशी’ असे म्हणतात.

पुराणात श्रीकृष्णाने युधिष्ठिराला देवशयनी एकादशीचे महत्त्व सांगितले आहे. कारण विश्वनिर्माता ब्रह्मदेवाने त्याचा पुत्र नारदांना एकदा त्याचे महत्त्व सांगितले होते. राजा मंडताची कथा याच संदर्भात सांगितली आहे. धर्मनिष्ठ राजाच्या देशात तीन वर्षे दुष्काळ पडला होता, परंतु राजाला पर्जन्य देवतांना प्रसन्न करण्याचा उपाय सापडला नाही. अखेरीस अंगिरस ऋषींनी राजाला देवशयनी एकादशीचे व्रत पाळण्याचा सल्ला दिला. असे केल्यावर विष्णूच्या कृपेने राज्यात पाऊस पडला. मृदुमान्य राक्षसाला शंकर भगवान यांनी असे वरदान दिले होते की तू कोणाकडूनही मरण पावणार नाहीस, परंतु एका स्त्रीच्या हातून तू मरशील. या वरामुळे गर्विष्ठ झालेला राक्षस देवांवर हल्ला करण्यास निघाला. त्यावेळी सर्व देव मदतीसाठी भगवान शंकराकडे गेले, परंतु त्यांनी स्वतः वरदान दिलेले असल्याने त्यांना काही करता येत नव्हते म्हणून सर्व देव भगवान शंकरासह एका गुहेत जाऊन लपले. त्याच वेळी देवांच्या श्वासातून एक देवता निर्माण झाली. त्याच देवीने मृदुमान्य राक्षसाला मारले व देवांची सुटका केली. ज्या देवीने सर्व देवांची मृदुमान्य नावाच्या राक्षसापासून सुटका केली, त्या देवीचे नाव एकादशी असे होते. अशा घटनेमुळे देवांना त्या दिवशी उपवास करावा लागला. लपून बसल्यामुळे त्यांना उपवास घडला व त्या दिवशी पाऊस पडत असल्याने सर्व देवांना स्नान घडले म्हणून त्या दिवसापासून एकादशीचे व्रत अथवा उपवास करण्याची प्रथा पडली.

एकादशीच्या दिवशी पालखी सोहळ्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या पालख्यांमध्ये आळंदीहून संत ज्ञानेश्वरांची, देहूतून संत तुकारामांची, त्र्यंबकेश्वर येथून संत निवृत्तीनाथांची व पैठणहून संत एकनाथांची आणि सासवडहून संत सोपानदेवांची पालखी निघते. पालख्यांचा हा सोहळा अवर्णनीय असतो. भक्तमंडळी या पालख्या घेऊन भक्त पुंडलिकाच्या भेटीस आषाढी महिन्यात ऊन, वारा, पावसात भिजत फारच मोठे अंतर पायी चालत पंढरपूरकडे वाटचाल करतात. या पालखी सोहळ्यात ३ ते ४ लाखांहून अधिक वारकरी सहभागी होतात.

वारकरी मंडळी ही भक्तीत रंगलेली, सदाचारी, निर्व्यसनी असते. वारकऱ्यांच्या गळ्यात माळ व कपाळावर बुक्क्याचा टिळा लावलेला असतो. त्यांच्या हातात टाळ, एकतारी मृदंग व डोक्यावर टोपी आणि शरीरावर पांढरा शर्ट आणि पायजमा किंवा धोतर असा पोशाख पुरुष मंडळींचा असतो. स्त्रिया नऊवारी साड्या नेसून डोक्यावर तुळस घेऊन दिंडीत सहभागी होतात. असा अवर्णनीय सोहळा याची देही याची डोळा पाहणे हे अत्यंत मोठे भाग्य समजले जाते. या दिंडीत सहभागी होण्यासाठी काही वयोमर्यादादेखील नसते. या दिंडी सोहळ्यात २ वर्षांच्या लहानग्यापासून तर ९० वर्षांच्या थोरांपर्यंत नागरिकदेखील सहभागी झालेले दिसून येतात. दिंडी सोहळ्यात स्त्री-पुरुष, लहानथोर सगळेच एकमेकांना माउली म्हणून हाक मारतात.

**- डॉ. जयश्री शहाणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २७ जून २०२३ | 

## दोन चुलत भावाच्या निधनाने बोरेगाववर शोककळा

**अक्कलकोट** : बोरेगाव (ता.अक्कलकोट) येथील ३५ वर्षीय युवकाचा रविवारी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास संगारेड्डी (हैदराबाद) हुन सोलापूरच्या दिशेने परत येत असताना मनाकली गावच्या जवळ अपघात होऊन मृत्यू झाला. लक्ष्मण उर्फ पिंटू काशिनाथ शिवशेट्टी (वय-३५,रा.बोरेगाव) असे अपघातामध्ये मयताचे नांव आहे. वाहनातील इतर पाच जण जख्मी झाले.अपघाताचे बातमी ऐकुन दुसऱ्या दिवशी अंत्यविधी करताना दुःख अनावर होऊन धक्का बसुन मयताचा चुलत भाऊ सोमनाथ कालिदास शिवशेट्टी (वय ३६) याचा हृदयविकाराचा धक्का बसुन मयत झाल्याने शिवशेट्टी परिवार व बोरेगाव परिसरावर शोककळा पसरली.

दौलत गोविंदे, सिद्धाराम प्रकाश बणजगोळे, लक्ष्मण उर्फ पिंटू काशिनाथ शिवशेट्टी, केदार सुभाष कस्तुरे, दीपक शिवाजी खांडेकर, नंदकुमार नरसप्पा सुतार हे सहा जण खासगी वाहनाने शनिवारी सायंकाळी पाच वाजता बोरेगाव (तालुका अक्कलकोट) हून बिदर, संगारेड्डी, हैद्राबाद, हुमनाबाद कडे गेले होते.रविवारी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास संगारेड्डी (हैदराबाद) हुमनाबाद कडे सोलापूरच्या दिशेने परत येत असताना मनाकली गावच्या



जवळ स्कार्पियो क्रमांक (एम. एच. ४३ ए.जे. २४६९) मागचे चाक फुटुन वाहन पलटी झाले.

या अपघातामध्ये लक्ष्मण उर्फ पिंटू काशिनाथ शिवशेट्टी (वय-३५, रा.बोरेगाव) जागेवरच मयत झाला.

# सिंघम स्टाईलने राव यांची एन्ट्री





सुराज्य/विशेष प्रतिनिधी

गेल्या आठवडाभरापासून सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय असलेल्या तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांचे सोमवारी सायंकाळी सोलापुरात आगमन झाले. मार्केट यार्ड येथे राव यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सोलापुरातील कार्यकर्त्यांनी धनगर समाजाची पारंपरिक घोंगडी आणि काठी देऊन त्यांचा सत्कार केला.

राव यांच्या गाडीवर मुक्तहस्ते गुलाबाच्या फुलांचा वर्षाव करण्यात आला. राव हे मंगळवारी त्यांच्यासोबत त्यांचे अख्ख मंत्रिमंडळ पंढरपूरला जावून श्री विठ्ठलाचे दर्शन घेणार आहे. राव यांचा रूबाब सोलापूरकरांना पहिल्यांदाच पाहायला मिळाला. सहाशे गाड्यांचा ताफा आणि खासदार, आमदार, पक्षाचे पदाधिकारी असा लवाजामा त्यांच्यासोबत होता. अगदी सिंघम स्टाईलने राव यांची सोलापुरात एन्ट्री झाली.

महाराष्ट्रात भारत राष्ट्र समिती या पक्षाचा मोठा विस्तार करण्याची राव म्हणजेच केसीआर यांची योजना आहे. त्यासाठी त्यांच्या दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात झाली आहे. आषाढी एकादशीच्या दोन दिवस आधी सुरू झालेल्या केसीआर यांच्या या दौऱ्याला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. केसीआर यांच्या दौऱ्यात तेलंगणाचे सर्व मंत्री, आमदार, खासदार आणि इतर नेते आहेत. तेलंगणातून तब्बल ६०० गाड्यांचा ताफा सोलापूर दौऱ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात दाखल झाला. राव हे सोमवारी सकाळीच तेलंगणावरुन निघाले. सोलापूरकडे रवाना झालेला ताफा जेवण्यासाठी धाराशिवमधील उमरग्यामध्ये दुपारी थांबला होता. एका अलिशान हॉटेलमध्ये भोजन केल्यानंतर त्यांचा ताफा संध्याकाळी सोलापूरमध्ये दाखल झाला.

## केसीआर यांची विठ्ठलासाठी धाव; मनी निवडणुकीचा भाव
## मुख्यमंत्री 'मोंडया सदनात' तर तीन मंत्री 'ललितराज'वर

सुराज्य/दीपक शेळके





तब्बल ३०० गाड्यांचा ताफा घेऊन विठ्ठलाचा धावा करणारे तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांनी मनी निवडणुकीचा भाव ठेऊन पूर्वभागातील दिग्गजांच्या भेटीचे नियोजन केले. स्व:त माजी खासदार धर्मण्णा सादूल यांचे 'मोंडया सदन' हे निवासस्थान गाठले तर त्यांच्याच मंत्रीमंडळातील तीन महत्वाच्या दिग्गज मंत्र्यांना कै. माजी खासदार लिंगराज वल्याळ यांचे 'ललितराज' निवास्थानी धाडत माजी नगरसेवक यांच्याची बंद खोलित चर्चा केली. सोलापुरातील या घडामोडी या आगामी निवडणुकीची केसीआर यांची व्यूवरचना असल्याचे मानले जात आहे.

पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी मोठ्या संख्येने वारकरी दाखल होत असतात. त्यामुळे ही संधी त्यांनी साधली. आषाढी वारीच्या निमित्ताने विठ्ठालाचा धावा करण्यासाठी आले असल्याचे सांगण्यात येत असले तरी केसीआर यांच्या मनी निवडणुकीचा भाव असल्याचे दिसून येते. स्वागत स्वीकारल्यानंतर काँग्रेसचे माजी खासदार धर्मण्णा सादुल यांच्या 'मोंडया सदन' निवासस्थानी भेट देऊन पाहुणचार घेतला सादूल परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

केसीआर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना राजकारण करण्यासाठी नव्हे तर विठ्ठलाच्या दर्शनासाठी इथे आल्याचे सांगितले मात्र त्यांच्या मनी कोणता भाव होता त्यांचा चेहरा स्पष्ट सांगत होता. भाजपचे माजी खासदार कै. लिंगराज वल्याळ यांचे सुपुत्र नागेश वल्याळ हे गेली दोन टर्म भाजपाचे नगरसेवक आहेत. पूर्व भागातील तरूण नेतृत्वाला आपल्याकडे खेचण्यासाठी तेलंगणाचे फायनान्स मिनिस्टर हरीश राव, तेलंगणा एक्सीज अँड स्पोर्ट्स टुरिझम मंत्री श्रीनिवास गौड, ऊर्जामंत्री जगदीश्वर रेड्डी सोमवारी सायंकाळी भाजपचे माजी खासदार लिंगराज वल्याळ यांचे ललितराज हे निवासस्थान गाठले. मंगळवारी सकाळी केसीआर हे देखिल 'ललितराज'वर येणार असल्याने या भेटीकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

## अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर

सुराज्य/सोलापूर

### ए. डी. जोशी ९०, दयानंद व संगमेश्वर ८८ तर वालचंद ८७ टक्केला क्लोज

इयत्ता अकरावी प्रवेशाची पहिली कट-ऑफ यादी सोमवारी त्या महाविद्यालयाने जाहीर केली असून जुळे सोलापूर भागातील ए. डी. जोशी कॉलेज शास्त्र शाखेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी ९० टक्केला क्लोज झाली आहे. दयानंद कॉलेजची ८८, वालचंद कॉलेजची ८७ तर संगमेश्वर कॉलेजची ८८ टक्केला क्लोज झाली आहे. प्रवेशाच्या गुणवत्ता यादी स्थान मिळविलेल्या विद्यार्थ्यांना येत्या १ जुलैपर्यंत त्या त्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा लागणार आहे.

ए. डी. जोशी कॉलेजची इतर प्रवर्गानुसार शास्त्र शाखेची गुणवत्ता टक्केवारी याप्रमाणे, सर्वसाधारण- ९० टक्के, एस. सी. - ५६ टक्के, एस. टी.- ७५.८ टक्के, व्हीजेएनटी- ५६.४० टक्के , एनटी बी- ७५.६/ टक्के , एनटी सी- ७०.२० टक्के, एनटी डी- ८१.४० टक्के , ओबीसी- ५५.८० टक्के, एसबीसी- ६२.८० टक्के.

दयानंद शास्त्र कॉलेजेची पहिल्या गुणवत्ता यादीची टक्केवारी याप्रमाणे, सर्वसाधारण ८८ टक्के, एस. सी.- ७३ टक्के, एस. टी.- ७२.८० टक्के, व्हीजे ए- ८१.४० टक्के , एनटी बी - ७८.४० टक्के , एनटी सी- ८०.२० टक्के , एसीबीसी- ८७.२० टक्के , ओबीसी- ८०.२० टक्के, ईडब्ल्युसी- ५२ टक्के .

वालचंद महाविद्यालय शास्त्र शाखा, सर्वसाधारण- ८७ टक्के , जैन प्रवर्ग- ५०.२ टक्के.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सर्वसाधारण- ७७.८ टक्के, जैन प्रवर्ग- ४५.२ टक्के.

दयानंद वाणिज्य कॉलेज, सर्वसााधारण ७१ टक्के, एस. सी.- ४२.८ टक्के, एसबीसी- ६९.८ टक्के, ओबीसी- ५२.४ टक्के, एनटी- ४३.२ टक्के.

संगमेश्वर कॉलेज कॉमर्स शाखा, सर्वसाधारण- ७६ टक्के, एस. सी.- ६३.२० टक्के, ओबीसी- ६३.६ टक्के, एसबीसी- ७१.४० टक्के , व्हीजे ए- ७६.६० टक्के, एनटी बी- ६३ टक्के, एनटी सी- ६५ टक्के, एनटी डी- ६० टक्के.

आता दुसरी यादी येत्या ६ जुलैला प्रसिध्द होणार आहे.

## तीनही आरोग्य शिबिराच्या उभारणीची पाहणी

सुराज्य/सोलापूर

आषाढी यात्रेच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या आरोग्यतपासणी आणि उपचारासाठी पंढरपूर मध्ये राज्य सरकारच्या वतीने तीन ठिकाणी मेगा कॅम्प घेतले जाणार आहेत. त्यामध्ये साधारण: २० लाख वारकऱ्यांची तपासणी होईल असा अंदाज असून आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आपल्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन या तीनही आरोग्य शिबिराच्या उभारणीची पाहणी केली.

राज्यभरातून शेकडो किमी. पायी चालत जवळपास ४६३ दिंड्या पंढरपूरकडे निम्म्यापेक्षा जास्त अंतर कापत पुढे वाट चालत आहेत . यंदा 'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी' या संकल्पनेमुळे आतापर्यंत सव्वा तीन लाख वारकऱ्यांची तपासणी पूर्ण झाल्याचा अहवाल आरोग्य विभागाकडे आहे. प्रत्येक दिंड्यांसोबत १०८ ची ॲम्ब्युलन्स आणि सुसज्ज वैद्यकीय पथके असल्याने भाविकांना तात्काळ वैद्यकीय उपचार दिला जात आहे.





यात्रा पंढरपूरमध्ये येताना पहिल्यांदा संत ज्ञानोबा, संत तुकाराम यांच्यासह महत्त्वाच्या संतांच्या पालख्या २७ तारखेला मुक्कामाला वाखरी येथील पालखी तळावर येणार आहेत. २८ जून रोजी हे सोहळे पंढरपूरमध्ये प्रवेश करतील. यंदा वाखरी येथील पालखी तळासमोर पहिला मोठा कॅम्प उभारला असून येथे जवळपास पाच हजार डॉक्टर आणि वैद्यकिय स्टाफ हजारो वारकऱ्यांवर २७ आणि २८ हे दोन दिवस तपासणी आणि उपचार करणार आहेत. आषाढी वारी निमित्त वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणी साठी पंढरपुरात महाआरोग्य शिबीर होत आहे. या शिबिरासाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी त्यांच्या विभागास दिलेली जबाबदारी चोख पार पाडावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील व महाआरोग्य शिबिराचे नोडल अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदूने यांनी केले आहे.

या संपूर्ण महाआरोग्य शिबिराची यंत्रणा पंढरपूर येथील सांवत निवास येथून प्रा. शिवाजी सावंत आणि त्यांचे पुतणे अनिल सावंत बारीक लक्ष देऊन हाताळत आहेत.

## मुक्ताईच्या पालखीत गरम डांबर अंगावर पडल्याने वारकरी संतप्त

### दोषींवर कारवाईची मागणी

सुराज्य/पंढरपूर



आषाढी यात्रा सोहळ्यासाठी मुक्ताईनगर-जळगावहून निघालेला संत मुक्ताबाईंचा पालखी सोहळा तब्बल ६०० कि.मी.चे अंतर कापून सोमवारी दुपारी पंढरपूरच्या वेशिवर दाखल झाला. मात्र त्याठिकाणी दाखल होताच ऐन गर्दीत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा सपाटा प्रसासन व ठेकेदाराकडून सुरू होता. पालख्या आल्यानंतर किमान काहीवेळ थांबणे गरजेचे असतानाही काम तसेच रेटण्याचा प्रयत्न सुरू होता.

दरम्यान कामगारांकडून रस्त्यावरून टाकण्यात येत असलेले गरम डांबर पालखीतील काही भाविकांच्या अंगावर उडल्याने वारकरी व कामगारांमध्ये बाचाबाचीचा प्रकार घडला. त्यामुळं काहीवेळ तनाव निर्माण झाला होता.

रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांकडून भाविक चालत असताना १८० ते २०० वारकऱ्यांवर गरम डांबर अंगावर पडल्याने बाबत माहिती घेतो त्यानंतरच प्रतिक्रिया देतो असे बांधकाम विभागाचे अधिकारी निमकर यांनी सुराज्य शी बोलताना दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



विठ्ठल.. विठ्ठल..विठ्ठल...

कल्याण

122-55-889




ESTD : 1994

Bhai Channusingh chandele Smruti Kendra Solapur Sanchlit



BHAI CHHANNUSINGH CHANDELE
COLLEGE OF SOCIAL WORK, SOLAPUR

भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय, सोलापूर

Recognised & Aided by Govt. of Maharashtra (India)
Affiliated to Punyshlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

163 A, Railway Lines, Old Employment Chow, Solapur - 413001. Ph : 0217 - 2317282
www.chandelecollegeofsocialwork.in - Email : bccmswsolapur@gmail.com

President : Shri. Hamirsingh C. Chandele | Secreatary : Shri. Ravindra Mokashi

भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय

**संस्थेची वैशिष्ट्ये :** थोर स्वातंत्र्य सेनानी भाई छन्नुसिंह चंदेले यांनी केलेल्या कार्याचा आदर्श व उपयोग समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींना, गोरगरिबांन,ा वंचितांना व दिनदुबळ्यांना मदत करणे या उद्देशासाठी व कार्यासाठी संस्थेची सन १९८६ यावर्षी स्थापना करण्यात आली. संस्थेच्या वतीने भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या २२ डिसेंबर या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात.



**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये :** थोर स्वातंत्र्य सेनानी भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या स्मृती प्रित्यर्थ सन १९९४ यावर्षी सोलापूर येथे समाजकार्य महाविद्यालय सुरू केले असून महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त १००% अनुदान प्राप्त आहे. महाविद्यालयकरीता जुना एम्प्लॉयमेंट चौक सोलापूर येथे स्वतंत्र तीन मजली इमारत असून मुलांकरिता वसतिगृहाची सोय आहे. महाविद्यालय MSW भाग १ व २ चा अभ्यासक्रम शिकविला जात असून दोन वर्गाची प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी इतकी आहे. स्वतंत्र ग्रंथालय असून सात ते आठ हजार पुस्तके उपलब्ध आहेत. महाविद्यालयाचे उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी हे परदेशात कार्यरत आहेत. तसेच शासकीय, निमशासकीय संस्था, महामंडळे, औद्योगिक इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पदावर कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबिर, सामाजिक शिबिर, राज्यस्तरीय परिसंवाद कार्यशाळा, सर्वेक्षण आदी उपक्रमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्याबरोबरच सामाजिक कार्य केले जाते. महाविद्यालयाचे विद्यार्थी सेट नेट परीक्षा इत्यादी परीक्षांमध्ये ही यशस्वी झाले आहेत. दरवर्षी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत उत्तुंग यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयात अनुभवी व तज्ञ शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद कार्यरत असून विद्यार्थ्यांना वैयक्तिकरित्या मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे महाविद्यालयाचा निकाल साधारणपणे शंभर टक्के लागतो.

महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.हेमूजी चंदेले व विश्वस्त प्रा.डॉ.रोझा चंदेले-पाराशर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय कार्यरत आहे.

संस्थेची वैशिष्ट्ये

- अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वर्ग
- १००% निकालाची परंपरा
- सुसज्ज भव्य शहराच्या मध्यवर्ती भागात तीन मजली इमारत
- पदवीनंतरचा पदव्यूत्तर कोर्स
- शासनाची स्कॉलरशिप
- प्रत्येकाकडे वैयक्तिक लक्ष
- अभ्यासक्रम पुर्ण झाल्यावर येथील विद्यार्थी परदेशात व भारतात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात मोठ्या ठिकाणी मोठ्या पदावर कार्यरत
- MSW भाग १ व २ अभ्यासक्रम प्रवेश क्षमता ६०

दरवर्षी २२ डिसेंबर यादिवशी भाई छन्नूसिंह चंदेले यांचा स्मृतीदिनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात येते.

डॉ.रोझा चंदेले-पाराशर
मो.९८८१२४९८५५

प्र.प्राचार्य
प्रा.गायकवाड एस.बी.
मो.९७६३८८४१४२

हेमूजी चंदेले
संस्थापक अध्यक्ष
मो.९८२२०९५७६४

राष्ट्रमाता इंदिरा बालक मंदिर व प्राथ.शाळा
देशभक्त भाई छन्नुसिंह चंदेले माध्य.विद्यालय

लक्ष्मी चौक, लाईट कंपाऊंडशेजारी, विडी घरकुल, सोलापूर



विशेष प्राविण्य

१) इयत्ता १० वी सलग चार वर्षे १००% निकालाची परंपरा
२) ३३ पैकी ३१ विद्यार्थी राज्यस्तरीय ATSE स्पर्धेत उत्तीर्ण
३) महानगरपालिका आंतरशालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत मुले सलग ५ वर्षे विजेते
४) महानगरपालिका आंतरशालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत मुली सलग ३ वर्षे विजेते
५) मतदार जागृती अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धेत कु.प्रचिती कनकी प्रथम
६) दरवर्षी भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य शिबिर, वृक्षारोपण
७) आत्तापर्यंत ३६ विद्यार्थींना जिल्हास्तरीय खेळाचे प्रमाणपत्र
८) कु. सदिया शेख व कु.महालक्ष्मी बुर्ला यांची विभागीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

शाळेची वैशिष्ट्ये

- अनुभवी व तज्ञ शिक्षक वृंद
- सर्व वर्गासाठी ई-लर्निंगची सुविधा
- भव्य इमारत, मोठ्या वर्ग खोल्या व विद्यार्थ्यांना योग्य असे बेंचेसची सोय
- खेळाचे मैदान, नियमित खेळाचा सराव
- शालेय अभ्यासक्रमाबरोबर ATSE, MTSE व स्कॉलरशिप स्पर्धा परीक्षांची तयारी
- प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष
- कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नाही

सुविधा

- बालवर्ग - लहान गट व मोठा गट
- इ.१ ली ते इ.७ वी सेमी इंग्रजी व मराठी माध्यम
- इ.८ वी ते इ.१० वी सेमी इंग्रजी व मराठी माध्यम

वरील सर्व वर्गासाठी प्रवेश देणे चालू आहे.
(पात्र विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल)

कार्यालयीन वेळ : सकाळी ८ ते ११

संस्थापक अध्यक्ष : मा.श्री.हेमूजी चंदेले (मो.९८२२०९५७६४)
विश्वस्त : डॉ.रोझा चंदेले-पाराशर (मो.९८८१२४९८५५)
सरचिटणीस : आबांदास शिंदे

## बघून दुचाकीची रेस वाढवली; तरुणाला बेदम मारहाण

**सोलापूर** : आपल्याकडे बघून मोटारसायकलींची रेस वाढविण्याच्या कारणावरून एका तरुणाला कुऱ्हाडीचा दांडा आणि काठीने मारहाण करून उचलून आपटण्यात आले . ही घटना कारंडे (ता. माळशिरस) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. आकाश शामराव कापसे (वय २६ रा. कारंडे) असे जखमी तरुणाचे नाव आहे . त्याने दिलेल्या फिर्यादीवरून नातेपुतेच्या पोलीसांनी धनाजी गोविंद मसुगडे, सागर मसुगडे, भगवान मसुगडे आणि अजय मसुगडे (सर्व रा.कारंडे ) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी कापसे हा रविवारी सकाळी चुलत्याच्या घरासमोर बसला होता . त्यावेळी गावातील वरील आरोपींनी तेथे येऊन आमच्याकडे बघून मोटरसायकलची रेस वाढवतो का ? असे म्हणत एकाने त्याला पकडले तर दुसऱ्याने त्याला मारहाण केली . तर तिसऱ्याने त्याला उचलून आपटले .यावेळी भांडण सोडविण्यास आलेल्या कापसे याचा भाऊ विशाल हा देखील जखमी झाला . अशी नोंद नातेपुते पोलिसात झाली आहे .

## पंढरपूरच्या नदीत चोरी

**सोलापूर** : पंढरपूर येथील नदीत स्नान करताना चोरट्याने एका भाविकांचे २२ हजार रुपये रोख आणि इतर साहित्य असा २७ हजाराचा माल पळविला . ही चोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली . सतीश सुभाष कोतकर (रा.कोपरगाव जि. अहमदनगर ) हे पंढरपुरात दर्शनासाठी आले होते . रविवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारात ते आपले साहित्य नदीजवळ ठेवून स्नान करीत होते . त्यावेळी हा प्रकार घडला अशी नोंद पंढरपूर शहर पोलिसात झाली आहे .

## चिंचोली एमआयडीसी येथे तलवारीने मारहाण दोघे जखमी

**सोलापूर** : पूर्वीच्या भांडणावरून तलवार आणि लोखंडी गजाने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले . ही घटना चिंचोळी एमआयडीसी येथे जखमींच्या घराजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडली . किशोर लहू जाधव (वय २५ ) आणि दत्तात्रय चंदू धोत्रे (वय ३० रा.चिंचोली एमआयडीसी ) असे जखमींचे नावे आहेत. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले . त्यांना सुभाष जाधव, त्र्यंबक जाधव यांनी मारहाण केली . अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## कुकर फुटल्याने महिला भाजली

**सोलापूर** : स्वयंपाक करताना कुकर फुटून गरम पाणी अंगावर पडल्याने कविता सुभाष मोकाशी (वय ५५ रा.निलमनगर ) ही महिला भाजुन जखमी झाली ही . घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली . तिला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले . एमआयडीसी पोलिसात याची नोंद झाली आहे .

## कुमठानाका येथे तीक्ष्ण शस्त्राने तरुणास मारहाण

**सोलापूर** : कुमठा नाका येथील चौकात हातभट्टी दारू आणण्यासाठी गेल्यानंतर झालेल्या भांडणात लाथाबुक्क्या आणि तीक्ष्ण शस्त्राने केलेल्या मारहाणीत फारूक शब्बीर मरखेड (वय २६ रा.शास्त्रीनगर ) हा तरुण जखमी झाला ही घटना सोमवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. शुभम आणि निखिल यांच्यासह १० ते १२ लोकांनी मारहाण केली . अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे .

# पहिल्याच पावसात उडाली तारांबळ; नाले तुंबले

## शहरात ठीक ठिकाणी साचले पाणी, निचरा झालाच नाही

**सुराज्य/सोलापूर**

**शहरात महापालिका प्रशासनाकडून मान्सून पूर्व कामे केल्याचा डांगोरा पिटण्यात आला मात्र आज पहिल्याच पावसाने शहरात ठीक ठिकाणी पाणीच पाणी साचले. पाण्याचा निचरा झालाच नाही. नाले तुंबले. घराघरात पाणी शिरले. यामुळे पाणी उपसा करत नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. सखल भागात पाणी साचले. जनजीवन विस्कळीत झाले. स्मार्ट सिटीअंतर्गत कामे झालेल्या भागातही मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात आला.**

अखेर आज शनिवारी सोलापूर शहरातही मान्सूनने जोरदार हजेरी लावली. यामुळे एकीकडे नागरिक सुखावले असले तरी पहिल्याच पावसात सोलापूर शहरात ठीक ठिकाणी पाणीच पाणी साचले. नाले तुंबल्याने मान्सूनपूर्व कामाचा निसर्गानेच पर्दाफाश केल्याचे दिसून आले. कोंतम चौक जवळील नाला तुडुंब वाहत होता. नाला तुंबल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. येथील दुकानासमोरील दुचाकी वाहने पाण्याखाली गेली. ही वाहने काढताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागली. येथील पेट्रोल पंपातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले. कुंभार वेस येथेही नाला दुथडी वाहत होता. या परिसरातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या दोन्ही ठिकाणी असलेला नाला मोठ्या प्रमाणात वाहत होता. नाला तुंबल्याने परिसरात पाणी साचले होते. नाल्यावरच शॉपिंग सेंटर बांधल्याने आतील बाजूचे नाले स्वच्छ करणे शक्य होत नाही. यामुळे अर्धवट नाले सफाई केली जाते. परिणामी परिसरात पाणी साचून पावसात मोठा फटका बसतो, अशी भावना येथील नागरिकांनी व्यक्त केली. उमा नगरी जवळील नालाही तुडुंब भरून वाहत असल्याचे दिसून आले.



७० फूट रोड, कोनापुरे चाळ, मिलिंद नगर, बुधवार पेठ यासह विविध ठिकाणी घराघरांमध्ये पाणी शिरल्याचे चित्र दिसून आले. घरातील साचलेले पाणी बाहेर उपसा करण्यात अबालवृद्ध गुंतले होते. यामुळे येथील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

विशेष म्हणजे, स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत कामे करण्यात आलेल्या कोंतम चौक व इतर परिसरातही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे दिसून आले. यामुळे स्मार्ट कामाचा बोजवारा उडाला असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

महापालिका प्रशासनाकडून गेली काही दिवसांपासून मान्सूनपूर्वक कामे झाल्याचा डांगोरा पिटला जात होता मात्र उशिरा पाऊस सुरू होऊनही पहिल्याच पावसात मान्सूनपूर्वक कामाचा पर्दाफाश झाल्याचे दिसून आले. यामुळे मान्सूनपूर्वक कामे पूर्ण केली का नाही याबद्दल प्रश्न उपस्थित होत आहे. महापालिका प्रशासनाने वेळीच पहिल्याच पावसाची विदारक चित्र लक्षात घेऊन तातडीने आवश्यक ती उपाययोजना आणि कार्यवाही करण्याची गरज वर्तवली जात आहे.



## हिराचंद नेमचंद वाचनालयात छ. शाहू महाराजांना अभिवादन

**सुराज्य/सोलापूर**

छत्रपती शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानाचा दौरा करून रयतेच्या अडचणी समजावून घेतल्या. आपल्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत राजवैभवाचा आणि सत्तेचा उपयोग जनसामान्याच्या उद्धारासाठी केला. शिक्षणातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अस्पृश्यांसाठी शाळा, मोफत सक्तीच्या शिक्षणाचा कायदा, वसतीगृहांची सोय, मागासवर्गीयांच्या महत्वाच्या पदावर नेमणुका, मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांत ५०% आरक्षण, विधवा पुनर्विवाहाचा कायदा, आंतरजातीय- आंतरधर्मीय विवाहास मान्यता , दुष्काळात शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात कर्जे, मोफत अन्नधान्य वाटप, जलसिंचनांच्या अनेक योजना, कलावंतांना- मल्लांना राजाश्रय देऊन आपण प्रजाहित दक्ष' राज्यकर्ते असल्याचे सिद्ध केले.

आपल्या महाराष्ट्रातील राजकारण्यांनी त्यांचा आदर्श समोर ठेवण्याची आवश्यकता आहे. असे विचार हि ने वा चे प्रमुख कार्यवाह डॉ श्रीकांत येळेगावकर यांनी अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांपुढे बोलताना व्यक्त केले.

## मराठा समाजातील गुणवंतांचा आज गौरव सोहळा

### नाव नोंदणी करण्याचे सेवा संघाचे आवाहन

**सुराज्य/सोलापूर**

मराठा सेवा संघाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे इयत्ता दहावी व बारावी परीक्षेमध्ये यश मिळवल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे. तरी मराठा समाजातील विद्यार्थी पालकांनी नाव नोंदणी करून सत्कार सोहळ्यात उपस्थित राहावे असे आवाहन मराठा सेवा संघाचे शहर अध्यक्ष सूर्यकांत पाटील, जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील यांनी केले आहे.

मंगळवार २७ जून रोजी सकाळी १० वाजता ग्रामीण पोलीस मुख्यालया समोरील अलंकार हॉल येथे सत्कार सोहळा होणार आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा होणार आहे दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य उबाळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. तर विभागिय अध्यक्ष उत्तराव माने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दहावीमध्ये ८० टक्के गुण, बारावी (एम.एच. सी आय टी ) मध्ये ७५ टक्के गुण बारावी नीट मध्ये कमीत कमी ५०० मार्क्स आणि बारावी आर्ट्स, कॉमर्समध्ये ७५ टक्के गुण असणे अपेक्षित आहे. तरी मराठा समाजातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी पालकांनी https://forms,gle/nXeMzmB5bvE1QPu77

वेबसाईटवर नाव नोंदणी करून होणाऱ्या सत्कार सोहळ्यात उपस्थित रहावे असे आवाहन मराठा सेवासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. समाजातील दोनशे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा यंदाच्या वर्षीचे नियोजन आहे.

## माळशिरस पंचायत समितीच्या कार्यालयातून लॅपटॉप गायब

**सुराज्य/सोलापूर**

माळशिरस येथील पंचायत समिती कार्यालयातून चोरट्याने लॅपटॉप, किबोर्ड, माऊस असा एकूण ३८ हजाराचा माल पळवला. ही चोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली . यासंदर्भात कार्यालयातील विजय विठ्ठल घनवट यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यात त्यांनी पंचायत समिती कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी यांच्या दालनात ही चोरी झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . पुढील तपास हवालदार रणदिवे करीत आहेत .

# किडवाई चौकात अतिक्रमण विरोधात महापालिकेची कारवाई

### विरोध करणाऱ्या तिघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**सुराज्य/सोलापूर**

रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्याची कारवाई महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून आज किडवाई चौक येथे पोलीस बंदोबस्तात करण्यात आली. या कारवाईस विरोध करणाऱ्या तिघाजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. याप्रसंगी शाब्दिक चकमक उडाली.



सोलापूर शहरात रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवण्याची मोहीम महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून गेल्या महिनाभरापासून नियमितपणे सुरू आहे. दरम्यान, आज दुपारी शहरातील गजबजलेले ठिकाण असलेले किडवाई चौक येथे अतिक्रमण विरोधी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. यावेळी काही जणांनी विरोध दर्शवला. शाब्दिक चकमक उडाली. अखेर विरोध करणाऱ्या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. किडवाई चौक परिसरातील एक खोके जप्त करण्यात आले तसेच रहदारीस अडथळा ठरणारे अनधिकृतपणे बांधण्यात आलेले दुकानासमोरील कट्टा , पत्राशेड वगैरे पाडण्यात आले.

सोलापूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्व नागरिक व व्यापाऱ्यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. शहरात रस्त्यावर व फुटपाथवर रहदारी अडथळा ठरेल असे अतिक्रमण करू नये. नियमानुसार असलेल्या आपल्या जागेतच आपला व्यवसाय थाटावा. अनधिकृतपणे कोणतेही साहित्य ठेवू नये अथवा बांधकाम करू नये. अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईस विरोध करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.


मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी जि. सोलापूर

**जाहिर निविदा सुचना**

जा.क्र.एम/कावि/२/७१७/२३ दिनांक २६/०६/२०२३

मैंदर्गी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकरीता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर स्वच्छता साठी लागणारे मैला सक्शन वाहन (Desludging Vehicle) ऑनलाईन निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन खरेदी करीत आहे. करीता महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या व अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणारे ठेकेदाराकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

निविदे बाबत सर्व अटी-शर्ती व वेळापत्रक महाराष्ट्र शासनाच्या, http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(अतिश वाळुंज)
मुख्याधिकारी
मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी

सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**शुध्दिपत्रक क्र. ०१**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजनेचे देसाई नगर येथे यांत्रिकी/विद्युत व ऑटोमेशन इत्यादी कामाचे संकल्पना, पुरवठा, उभारणी करणे व यशस्वीरित्या चाचणी देणे कामाची ई-निविदा, सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांचेकडून र. रु. २,०१,४६,९५०/- इतक्या रकमेची मागविण्यात आले होते. सदर निविदा प्रक्रियेस खालीलप्रमाणे प्रथम मुदतवाढ देणेत येत आहे.

Tender ID_2023_SMC_912795_1

| तपशिल | प्रसिध्द केलेले दिनांक | मुदतवाढी नंतरचे दिनांक |
|---|---|---|
| बयाणा रक्कम व निविदा किंमत भरणे अंतिम तारीख | दि. ०८.०६.२०२३ रोजी सायं. १७.०० पर्यंत | दि. ०४.०७.२०२३ रोजी सायं. १७.०० पर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दि. २३.०६.२०२३ रोजी सायं. १७.०० पर्यंत | दि. ०४.०७.२०२३ रोजी सायं. १७.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक | दि. २७.०६.२०२३ रोजी सायं. १२.०० पर्यंत | दि. ०६.०७.२०२३ रोजी सायं. १२.०० पर्यंत |

सही/-
कार्यकारी अभियंता तथा
सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



मंगळवेढा नगर परिषद,मंगळवेढा

**सूचना**

मंगळवेढा शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण

क्र ८७९, दि २९/०५/२०२३

ज्याअर्थी, मंगळवेढा नगरपरिपदेने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारूप विकास योजना, मंगळवेढा, दि.२१/११/२०२२ चे सुचनेव्दारे नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात पुणे विभागीय पुरवणी भाग - एकमध्ये दि.०१-०७ डिसेंबर २०२२ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दि.२८/०२/२०२३ रोजी सादर केला;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती निर्णय घेऊन व नियोजन समितीने केलेल्या शिफारशी मान्य करुन तसेच उक्त नियोजन प्राधिकरणाने नव्याने बदल सुचवून, उक्त योजनेत फेरबदल/बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. १३८ दि.०९/०५/२०२३ पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) खालील तरतूदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरवदल/बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदलांची/बदलांची सुची परिशिष्ठ 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर फेरबदल/बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसाच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून, www.mangalwedhamc.org. या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

१) मुख्याधिकारी मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा.

२) सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा, सोलापूर

ठिकाण :- मंगळवेढा
दि. २९/०५/२०२३

शिक्का

सही/-
(निशिकांत प्रचंडराव)
मुख्याधिकारी

**परिशिष्ट - ब**

अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सुची

| क्रमांक | फेरबदल / बदलांचा तपशिल |
|---|---|
| एम-1 | दत्त मेडिकल ते बोराळे नाका या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-2 | सराफ गल्ली, काझी गल्ली, खाटीक गल्ली, वठारे गल्ली ते बोराळे वेस या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-3 | सराफ गल्ली ते मारवाडी गल्ली या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-4 | हजारे गल्ली ते सराफ गल्ली ते काझी गल्ली ते मारवाडी गल्ली या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-5 | गैबीपीर दर्गा, सराफ गल्ली ते राजहंस चौक या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-6 | मुरलीधर चौक ते हजारे गल्ली या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-7 | माने (न्हावी) गल्ली या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-8 | लाळे दुकान ते मकानदार गल्ली या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-9 | शिवप्रेमी चौक ते मुलाणी गल्ली मार्गे मंगळवेढा - पंढरपूर रस्त्यापर्यंत या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-10 | दत्तु गल्ली पोलीस चौकी ते दामाजी रस्ता या 12मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-11 | सि.स.नं.469/1/अ/ब/क हे सार्वजनिक - निमसार्वजनिक विभागात समाविष्ट असलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-12 | सि.स.नं.271 मधील 9.00मी. रुंद रस्त्याची आखणी रदद करण्यात येत असून त्याखालील क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. सदर रस्त्याची आखणी नकाशात दर्शविल्याप्रमाणे उत्तर दिशेस स्थलांतरित करण्यात येत आहे. |
| एम-13 | सि.स.नं.268/1/1 हे सार्वजनिक - निमसार्वजनिक विभागात समाविष्ट असलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-14 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.2-बगीचा या आरक्षणामधील सि.स.नं.29 खालील जागेचे क्षेत्र आरक्षणामधून वगळून नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-15 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.12-बगीचा हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. तसेच सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.4602 या जागेत स्थलांतरित करणेत येत आहे. |
| एम-16 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.11- पार्किंग हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. तसेच सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.4679 या जागेत स्थलांतरित करणेत येत आहे. |
| एम-17 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.10- खेळाचे मैदान हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. तसेच सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.4054 या जागेत स्थलांतरित करणेत येत आहे. |
| एम-18 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.8- प्रसुती गृह हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. तसेच सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.271 या जागेत स्थलांतरित करणेत येत आहे. |
| एम-19 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.24-टाऊन हॉल हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. तसेच सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.271 या जागेत स्थलांतरित करणेत येत आहे. |
| एम-20 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील सोलापूर रस्त्यावरील विद्यमान स्मशानभूमीपैकी पुर्वेकडील सुमारे 1.27एकर इतके क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या प्रयोजनसाठी नकाशात दर्शविल्याप्रमाणे नव्याने आरक्षित करणेत येत आहे. |
| एम-21 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.25- ट्रक टर्मिनस या आरक्षणाचे नामाभिधान बदलून ते नकाशात दर्शविल्याप्रमाणे मलनि:सारण केंद्र या प्रयोजनासाठी आरक्षित करणेत येत आहे. |
| एम-22 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.21- पार्क हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.4054 या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात येत आहे. |
| एम-23 | चोखामेळा चौक ते मंगळवेढा प्रांत कार्यालय या 18मी. रुंद रस्त्याची रुंदी 9.00मी. करणे व रस्त्याच्या प्रस्तावामधून वगळण्यात आलेले क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे लगतच्या भूवापरात समाविष्ट करणेत येत आहे. |
| एम-24 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.29- मटण मार्केट हे आरक्षण संपुर्णपणे वगळून त्याखालील क्षेत्र नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. सदर आरक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे सि.स.नं.271 या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात येत आहे. |
| एम-25 | प्रारुप प्रसिध्द विकास योजनेतील आ.क्र.4- पार्किंग या आरक्षणाचे नामाभिधान बदलून ते नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.4-बगीचा या प्रयोजनासाठी आरक्षित करणेत येत आहे. |
| एम-26 | सि.स.नं.271 या जागेमध्ये आ.क्र.40-पार्किंग हे आरक्षण नव्याने नकाशात दर्शविल्यानुसार समाविष्ट करण्यात येत आहे. |

शिक्का

सही/-
(निशिकांत प्रचंडराव)
मुख्याधिकारी

# दहा हजार वारकऱ्यांसाठी एकात्मिक निवारा केंद्र : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

**आषाढी करिता येणाऱ्या भाविकांसाठी जिल्हा परिषदेने एकात्मिक वारकरी निवारा केंद्र उभारले आहे. यामध्ये जवळपास दहा हजार वारकरी बसतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या एकाच ठिकाणी ९ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथे ही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्राचा वारकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.**

## निवाऱ्यामध्ये होणार एकूण ९ सुविधांचा लाभ



आषाढी यात्रा कालावधीत वारकरी यांना शौचालय सुविधा व स्नानगृह व व निवारा साठी खुप संघर्ष करावा लागतो. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे संकल्पनेतून वारकरी यांना चांगल्या सुविधा पालखी मार्गांवर देण्यात येत आहेत. ग्रामविकासमंत्री गिरीष महाजन यांनी देखील वारकरी यांना सुविधा देण्यासाठी सुचना केली होती. त्या नुसार पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथे दहा हजार वारकरी यांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

दि. २८ ते ३० जून या कालावधीत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पंढरपूर ला टेंभुर्णी व करकंब मार्गे येणारे भाविकांना चांगली सोय झाली आहे. या साठी नोडल अधिकारी म्हणून अक्कलकोट चे गटविकास अधिकारी सचिन खुडे . पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रशांत काळे हे काम पाहत आहेत.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना परिसरात ही सुविधा देण्यात आली आहे. या ठिकाणी सीसीटिव्ही, हिरकणी कक्ष, कपडे बदलण्याची सुविधा, अग्निशामक, पिण्याचे शुध्द पाणी, स्नान करणे साठी स्नानगृह, आरोग्य पथक, मोबाईल चार्जिंग ची सुविधा, तसेच दहा हजार वारकरी यांना पुरेल एवढी शौचालय सुविधा देण्यात आली आहे. तीन दिवस या ठिकाणी सुविधा देण्यात येत आहेत. पंढरपूर पासून ८ किमी अंतरावर ही सुविधा आहे. गुरसाळे पंढरपूर मार्गांवर ही सुविधा देण्यात आली आहे. या सुविधे साठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी काम पाहत आहेत.

## मोबाईलवर आलेली लिंक क्लिक केली अन कांही वेळात बँक खात्यातून रू ९० हजार गेले

✔ सुराज्य/बार्शी

मोबाईलवर संदेश पाठवून त्यातील लिंकद्वारे पॅन नंबर अपडेट करायला सांगून दोन वेगवेगळया ट्रॅन्झेक्शन द्वारे एका शिक्षीकेची एकूण ९० हजार रूपयांची फसवणूक करण्यात आली. याबाबत अज्ञात व्यक्तीवर बार्शी शहर पोलीसांत फसवणूकिचा गुन्हा दाखल झाला आहे. निता श्रीनिवास खिरस्ते रा.कासारवाडी रोड,बार्शी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

दि. २१ रोजी फिर्यादी दुपारी १२ वाजता घरी असताना त्यांच्या मोबाईलवर सीपी-बॅकएन यावरून संदेश आला. त्यामध्ये डियर एसबीआय कस्टमर, युअर अकाऊंट हॅज बीन सस्पेक्टेड टुडे. प्लीज अपडेट युअर पॅनकार्ड इमिडिएटली द पे क्लीक हिअर द लिंक अ०४०डॉट शॉर्ट डॉट जीवाय स्लॅश के थॅन्क्स एसआरआय इंडिया'' असा (इंग्रजी भाषेतून)उल्लेख होता. फिर्यादीने सदर लिंकला क्लिक केले. त्यानंतर एक वेब पेज ओपन झाले. त्यामध्ये एंटर युअर पॅन नंबर असा उल्लेख होता. त्या चौकटीमध्ये फिर्यादीने पॅन नंबर टाईप करून सबमीट बटनावर क्लिक गेले.

त्यावेळी सदर वेब पेज अचानक स्क्रीन वरून गायब झाले. त्यानंतर दुपारी ३.३४ वाजता त्यांचे मोबाईलवर दोन संदेश आले. त्यामध्ये २५ हजार रूपये व ६५ हजार रूपये वेगवेगळया ट्रॅन्झेक्शन द्वारे त्यांच्या बँक खात्यातून रक्कम कमी झाल्याचा उल्लेख होता. त्यानंतर त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सुभाषनगर बार्शी येथे चौकशी करण्या करिता गेल्या. त्यांनी सदर प्रकार हा ऑनलाईन फ्रॉडचा असावा असे सांगितले. नंतर त्यांनी पोलीसांत याबाबत तक्रार दिली.



## कर्जाची वसुली विषयावर चर्चासत्र

✔ **सोलापूर :** कायदेशीररित्या बँकांनी थकित कर्जाची वसुली कशी करावी 'याबद्दल माहिती अॅड.सागर पाटील यांनी दिली. तर बँकांनी शाखा कशी टिकवून ठेवायची याची माहिती अमित रेठरेकर यांनी दिली.सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनचे दि.२४ जून रोजी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी आयोजित चर्चासत्रात त्यांनी माहिती दिली. सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनचे चेअरमन श्री. अशोक लुणावत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. असोसिएशनच्या संचालिका अस्मिता गायकवाड यांची मनोरमा को-ऑप.बँकेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल असोसिएशनच्या वतीने चेअरमन अशोक लुणावत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बँक्स् असोसिएशनचे संचालक राजगोपाल मिणीयार, शंकर पाटील, अशोक सुरवसे, अस्मिता गायकवाड, मोहोळ अर्बन बँकेचे संचालक सागर फाटे, संचालिका प्रांजली फाटे, मॅनेजर संध्या फाटे, सुदर्शन शिंदे, निशीगंधा बँकेचे कैलास शिर्के, महावीर बँकेचे कृष्णहरी मैसूर, माढेश्वरी बँकेचे नंदकुमार दुडम असम ७४ जण उपस्थित होते. राजेंद्र कोठावळे यांनी आभार मानले. सदर चर्चासत्राचे सूत्रसंचालन बँक्स् असोसिएशनचे सी.ई.ओ. शुभांगी ढवळे यांनी केले.



## हसापूर वाचनालयात बाल : कुमार ज्ञानकोपरा

✔ **अक्कलकोट :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय हसापूर येथील वाचनालयात बाल व कुमार वाचकासाठी बाल - कुमार ज्ञानकोपरा विभाग सुरु करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरुवात ग्रंथालयाचे जनक डॉ एस. आर. रंगनाथन यांचे प्रतिमेचे पूजनाने करण्यात आली. वाचनालयामार्फत सर्व प्रथमतः बाल कुमार वाचकाचे स्वागत करुन बालकुमार ज्ञानकोपरा (चिल्ड्रन नॉलेज सेंटर )हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रविकिरण शिंपी यांनी सविस्तर पणे माहिती देताना म्हणाले की, लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी या मुलांच्या हातात पुस्तक सोपविणे गरजेचे आहे आणि ती सेवा वाचनालयाने विनामुल्य तसेच निरंतर पुरविण्याचे उदिष्ट ठेवले असून त्यासाठी ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सार्वजनिक ग्रंथालयाना सर्व प्रकारचे सहकार्य करणार असल्याचे शिंपी यांनी सांगितले.तसेच गावातील सर्व बाल व कुमार वाचकाना वाचक सभासद करुन घेतल्याची माहिती अश्विनी शिंपी यांनी दिली.यावेळी वाचक,बालवाचक व आश्विनी शिंपी,दत्ता गुमते,सुनिता जाधव, विष्णू शिंदे,मिनिक्षी स्वामी,मिनाक्षी सुतार,शुभांगी जाधव,महानंदा स्वामी, महांतेश स्वामी,महेश स्वामी, कर्मचारी आदी उपस्थित होते.



## मोहिते-पाटील महाविद्यालयात वृक्षारोपण

✔ **नातेपुते :** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे संस्थापक प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी व साऊथ एस्टर्न नॉर्वे विद्यापीठात प्राध्यापक पदावर कार्यरत असणारे तसेच गेल्या आठ-दहा वर्षांपासून सावित्रीबाई फुले विद्यापीठातील एका प्रकल्पावर काम करत असणारे आरमंड अमास यांच्या प्रमुख उपस्थिती वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ घाडगे, डॉ. भोसले राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. जाधव, डॉ. रिकामे , महाविद्यालयाचे प्राध्यापक जगदीशचंद्र मुळीक, प्राध्यापक डॉ.राजेंद्र खंदारे प्रकल्पाधिकारी प्रा. श्रीकांत पवार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दत्तात्रय साळवे, प्रा. अनिल घेमाड, प्रा. सुहास नलावडे, प्रा. मोहन सावंत , मुख्य लिपिक श्री. हनुमंत वाघमोडे, श्री. नागराज करपे, सुधाकर काळे आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संभाजी बनसोडे यांनी केले तर प्रा. डॉ. रिकामे यांनी आभार मानले.

## बार्शी पोलिसांमुळे दोन मुले पालकांच्या ताब्यात

✔ **बार्शी :** आईवडील रागावल्याने रागाच्या भरात कोणाला काही न सांगता पुणे येथे निघालेल्या दोन अल्पवयीन मुलांचे बार्शी शहर पोलीसांनी समुपदेशन करून पुन्हा पालकांच्या स्वाधीन केले. बार्शी शहर पोलीसांनी वेळीच सतर्कता दाखविल्याने हैराण झालेल्या पालकांची चिंता दूर झाली. अधिक माहिती अशी की, बार्शी शहरातील एस.टी.स्टॅंड येथे दोन अल्पवयीन मुले फिरत असल्याबाबतची माहिती बार्शी शहर पोलीसांना मिळाली. त्यानुसार पो.ना.अमोल माने, सचिन देशमुख,अविरत बरबडे यांनी एस.टी. स्टॅंड येथे जावुन चौकशी केली. तेथे त्यांना दोन अल्पवयीन मुले दिसली. त्यांना विश्वासात घेवुन, धीर देवुन विचारले असता त्यांनी त्यांची नावे सार्थक समाधान सरवदे (वय ११), सोहम विशाल मिरवणे (वय ८)( दोघे रा.तेरखेडा जि.धाराशिव) येथील असल्याचे सांगुन आई वडीलाबरोबर भांडण झाल्याने त्या रागाच्या भरात कोणास काही न सांगता सकाळी एस.टी.ने. तेरखेडा येथुन पुणे येथे जाणार असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी त्यांना बालस्नेही कक्षामध्ये आणुन त्याचे पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी व स.पो.नि.ज्ञानेश्वर उदार यांनी समुपदेशन केले.

## ट्रॅक्टर बांधावरून पलटी झाल्याने तरूण ठार

✔ **सांगोला :** सांगोला शहरातील जानकर वस्तीवरील विजय दशरथ जानकर वय २८ हा स्वतःच्या शेतातील जमीन ट्रॅक्टरने रोटरून घरी परत येत असताना ट्रॅक्टर बांधावरून पलटी झाल्याने त्याखाली सापडून मयत झाल्याची घटना रविवार २५ जून रोजी सकाळी दहाच्या सुमारास घडली

याबाबत पोलीस आणि दिलेली माहिती अशी की विजय जानकर हा स्वतःच्या महिंद्र अर्जुन ट्रॅक्टर घेऊन स्वतःच्या शेतातील जमीन रोटरण्यासाठी सकाळी आठ वाजता गेला होता तो दहा वाजता काम करून येत असता बांधावरून ट्रॅक्टर पलटी झाला व त्याखाली सापडला त्यास ट्रॅक्टर खालून काढून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरनी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले याबाबत सांगोला पोलीस स्टेशनमध्ये संतोष माका जानकर यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सांगोला पोलीस स्टेशन करीत आहे

# अख्ख्या जगात मोंदीचा गवगवा : केशव उपाध्ये

✔ सुराज्य/सोलापूर



मागील ९ वर्षात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने देशाच्या विकासात सर्वसामान्यांसाठी ८०० नवनवीन योजना आणल्या कोरोनासारख्या लसीचे देशात तातडीने उत्पादन करून इतर राष्ट्रांनाही पुरविले. त्यामुळे आज देशात नाही तर जगात मोदींचे नाव झाले असल्याचे भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी येथे केले.

श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की, मोदी सरकारच्या कारकिर्दीतील गेल्या नऊ वर्षाची देशाची वाटचाल ही देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीतील सर्वाधिक तेजस्वी वाटचाल आहे. भ्रष्टाचार मुक्त शासन सर्वांच्या सहयोगाने सर्वांचा विकास, बेटी बचाव बेटी पढाव, अभियानातून कन्या जन्मास प्रतिष्ठा मिळवून देणारा विचार, बेघरांना हक्काचे घर देणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेतून अडीच कोटीहून अधिक कुटुंबियांना मिळालेली सावली. जलजीवन मिशनद्वारे वीस कोटी घरात पोहोचलेल्या प्रयोजनच्या वाहिन्या, .उज्वल योजनेतून साडेआठ कोटी घरात आलेले गॅस सिलेंडर, सौभाग्य योजनेतून तीन कोटी घरांना मिळालेली वीज जोडणी व सुमारे ४० कोटी एलईडी बल्बमुळे उजाळलेली घरे ही मोदीजींच्या ध्येय शक्तीची उदाहरणे आहेत.

मिशन इंद्रधनुष्यद्वारे देशभरातील कोट्यावधी बालकांचे लसीकरण व जन आरोग्य योजनेतून देशातील साडेतीन कोटीहून अधिक कुटुंबीयांना मिळणाऱ्या मोफत उपचार सुविधा, अटल पेन्शन योजना, सेनादन योजना यासारख्या योजना म्हणजे सामान्यांच्या आर्थिक स्थितीला अतिउर्जा अवस्था देण्याच्या प्रयत्न झाले आहेत, असेही उपाध्ये म्हणाले

मोदींजींच्या या ऐतिहासिक कामगिरीचे सर्वत्र कौतुक असून त्यांच्या अतुट कार्याची नोंद जागतिक पातळीवरही घेतली जात आहे. सर्वो त्कृष्ट पंतप्रधान म्हणून त्यांचे अनेक राष्ट्राच्या अध्यक्षांनी त्यांना शाबासकी दिली आहे, असे सांगून उपाध्ये म्हणाले की, विरोधकांनी कितीही मोट बांधली तरी लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार २०१९ पेक्षाही जास्त जागा जिंकून एकहाती सत्ता स्थापन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस भाजपचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, विठ्ठल बडगंची, योगेश कबाडे, रुद्रेश बोरामणी आदी उपस्थित होते.



## ऊस उत्पादकांचे आर्थिक हित जपण्यासाठी आवताडे शुगर कटीबद्ध : संजय आवताडे

### आवताडे शुगरच्या दुसऱ्या गळीत हंगामाचा रोलर पूजन

✔ सुराज्य/मंगळवेढा

शेतकरी वर्गाला केंद्रस्थानी ठेवून सुरूवाती पासून शेवट पर्यंत खाजगी कारखान्यामध्ये उसाला भरीव व अपेक्षित दर देण्याचा विक्रम आपल्या कारखान्याच्या नावावर झाला आहे. त्यामुळे दुसऱ्या हंगामामध्येही शेतकरी वर्गाच्या सर्वांगीण हिताला निश्चितपणे प्राधान्य देण्यासाठी आम्ही सतत कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन चेअरमन संजय आवताडे यांनी केले आहे.

नंदूर येथील आवताडे शुगर अँड डिस्टीलरीजच्या दुसऱ्या गळीत हंगामाच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने काखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांचे हस्ते पूजा करून मिल रोलर समारंभ उत्साहात संपन्न झाला.त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सोमनाथ आवताडे, चंद्रकांत पडवळे, कुर्मदास चटके, मोहन पिसे, सुहास शिनगारे, भारत निकम, विजय माने, विलास राठोड, बंडू हाके, उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन संजय आवताडे म्हणाले की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील हंगामात शेतकरी वर्ग व ऊस उत्पादकांच्या अर्थिक सुबत्तेसाठी आणि सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील आहे.तसेच कारखान्यामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व विभागाचे अधिकारी, व कर्मचारी यांना विश्वासात घेऊन व त्यांच्या सहकार्याने आवताडे शुगरने पहिल्याच वर्षी कमी कालावधीमध्ये सुरु करून विक्रमी गाळप करुन जिल्ह्याच्या साखर कारखानादारीमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या कार्यक्रमासाठी, नंदुरचे माजी सरपंच दामोदर कांबळे, मोहन पवार, राहुल नागणे, तोहींद शेख, दामोदर रेवे, ज्ञानेश्वर बळवंतराव, संतोष कदम., रघुनाथ उन्हाळे, संभाजी फाळके, मनोज होलम,अभिजित पवार, अजय सरवळे, चंद्रकांत राठोड, रणजित पवार आदी मान्यवर व पंचक्रोशीतील ऊस उत्पादक, ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शी बसस्थानकातून महिलेचे ४० हजाराचे दागिने पळवले

✔ सुराज्य/बार्शी

बार्शी येथील बस स्थानकात बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिलेच्या पिशवीतील ४० हजार रुपये किमतीचे दागिने असलेले पर्स पळवली. ही चोरीची घटना काल शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

या संदर्भात शशिकला दिलीप मगर (वय ५४ रा.आगळगाव रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली . त्या काल दुपारी आपल्या पतीसोबत पुणे येथे जाण्यासाठी लातूर ते नालासोपारा या बस मध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांची दागिन्याची पर्स पळवली . अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## डॉ संतोष नवले यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून पदभार घेतला



✔ **सोलापूर :** जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात गेल्या आठ-दहा महिन्यापासून जिल्हा आरोग्य अधिकारी हे पद प्रभा री होते. त्यां जागी डॉ बागडे यांच्याकडे प्रभारी पदाची सूत्रे होती. त्या ठिकाणी आज अखेर जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून धुळे जिल्हा परिषदेतून डॉ संतोष गोविंद नवले यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून पदभर स्वीकारला .

त्यांच्याकडे आषाढी वारीमध्ये महा आरोग्य शिबिराचे कामकाजाकरिता अत्यावश्यक बाब म्हणून पुढील आदेश येईपर्यंत त्यांच्याकडे ही जबाबदारी. (नियुक्ती) सोपविण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

## हर्षद निगडे यांनी घेतला कृषी अधिकाऱ्याचा पदभार

✔ सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुका कृषी अधिकारी म्हणून हर्षद दत्तात्रय निगडे यांनी पदभार घेतला आहे. या अगोदर मोहोळ येथे मंडळ कृषी अधिकारी म्हणून तीन वर्षे काम पाहिले आहेत.त्यानंतर पदोन्नती होऊन अक्कलकोट येथे तालुका कृषी अधिकारी म्हणून पदभार घेतले आहेत.

यापूर्वी परांडा, उस्मानाबाद येथे सहा वर्षे मंडळ कृषी अधिकारी म्हणून काम केले आहेत.ते सातारा जिल्ह्यातील फलटण या गावचे रहिवाशी आहेत.यापूर्वी तालुका कृषी अधिकारी म्हणून रामचंद्र माळी यांच्याकडे अतिरिक्त पदभार होता. आता अक्कलकोटला कायम स्वरूपी तालुका कृषी अधिकारी पद मिळाल्याने शेतकर्यात समाधान व्यक्त होत आहे.यावेळी बोलताना निगडे म्हणाले की,अक्कलकोट तालुका हा दुष्काळी भाग आहे. खत दुकानदाराने युरिया खत घेतल्यावरच इतर खत ,बियाणे घेण्याची सक्ती करतात. अशा दुकानदाराविरुद्ध शेतकऱ्यांनी आम्हाला आवश्य कळवावा त्यांच्यावर योग्य ते प्रस्तावित कारवाई करता येईल.ज्या ज्या ठिकाणी भाव फलक नाही, चढत्या दराने विक्री होतो किंवा टोल क्रमांक नाही यासह आदी विविध प्रकारचे तपासणी करण्यात आले आहे.तसा काही दुकानदारांना सूचनाही दिलेली आहे. यासाठी भरारी पथक देखील नेमले आहे.

# स्वर आर्या एक भाव मैफिल सदाबहार गीतांनी बहरली

✔ सुराज्य/अक्कलकोट



गणराया..!, नरसोबाच्या वाडीला जाईन..!, देवाचिया दारी..! तुंगा तिरदी निंत यतवान्यारे, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा..! श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..! विठ्ठला तू वेडा कुंभार..! अशा एक ना अनेक मराठी, हिंदी व कन्नड भावगीते व भक्तीगीतांनी ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या स्वर आर्या' एक भाव मैफिल या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, रविवार सायंकाळी ७ वा. स्वर आर्या' एक भाव मैफिल, सादरकर्ते - आर्या आंबेकर व सहकलाकार पुणे ह्या कार्यक्रमाने तिसरे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन मराठी अभिनेता अक्षय मुदावाडकर, निलकंठ गुरुजी, दुधनी बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, डॉ.आसावरी पेडगावकर, प्रिया बसवंती, डॉ.प्रसाद प्रधान, डॉ.आर.व्ही.पाटील, राजशेखर तथा अप्पी उमराणीकर, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, प्राची आंधळकर, योगेश अहंकारी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्याय हे देखील उपस्थित होते.

याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते - आर्या आंबेकर आणि सहकलाकार यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

**गुणीजन गौरव :**
उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस उप निरीक्षक चंद्रकांत पुजारी, डॉ. प्रदीप घिवारे, पोस्टल असिस्टंट देविदास पल्लेवाड यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, अक्षता खोबरे, कोमल खोबरे, जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल मचाले, संपदा श्रीमान व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, राजेंद्र लिंबीतोटे, स्वामीराव मोरे, योगेश पवार, रोहित खोबरे, प्रा. शरणप्पा आचलेर, अतिश पवार, राजु नवले, सागर गोंडाळ, पिंटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बसवराज धनशेट्टी, राजकुमार गोब्बुर, राहुल गोविंदे, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, संभाजीराव लोंढे, सुधाकर काळे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था अराध्य इलेक्ट्रिकल यांनी केले.

## महत्त्वाचे वृत्त

### 'त्या' दुर्घटनेतील माय-लेकराचा अखेर मृत्यू

**मुंबई** : विद्याविहार पूर्वेला असलेल्या चित्तरंजन कॉलनीत रविवारी सकाळी एक दुमजली बंगला आठ ते दहा फूट खाली खचला होता. रात्री उशिरा हा बंगला जमीनदोस्त करून तेथे अडकलेली वृद्ध महिला व तिच्या मुलाला २० तासानंतर बाहेर काढण्यात आले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता. विद्याविहार येथील राजावाडी रुग्णालय परिसरात असलेल्या चित्तरंजन कॉलनीत रविवारी सकाळी नऊच्या सुमारास एक बंगला सात ते आठ फूट खचला होता.

### दोन हजाराच्या दोन तृतियांश नोटा महिनाभरात जमा

**मुंबई** : चलनातून दोन हजार रुपयांच्या नोटा परत घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर एका महिन्यात ३.६२ लाख कोटी रुपयांपैकी दोन तृतीयांशपेक्षा अधिक (२.४१ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक) नोटा बँकांमध्ये जमा झाल्या, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले. ३० सप्टेंबपर्यंत बँकांमध्ये या नोटा जमा करण्याच्या किंवा त्याच मूल्याच्या दुसऱ्या नोटा बदलून घेण्याचे आवाहन लोकांना करण्यात आले आहे. मार्च २०२३ पर्यंत चलनात एकूण ३.६२ लाख कोटी रुपयांच्या दोन हजाराच्या नोटा होत्या.

### लातूरच्या युवकाची १० लाखांची फसवणूक

**लातूर** : समाजमाध्यमावर झालेल्या ओळखीतून अमिषाला बळी पडत फसवणूक झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहे. लातूरमध्येही असाच प्रकार घडला आहे. इंस्टाग्रामवर रिल्स पाहणे, फॉलो करणे तरुणाला चांगलेच महागात पडले असून त्याला तब्बल १० लाखांचा गंडा बसला आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने पोलिसांकडे धाव घेतली.

### पीएमटीतर्फे पुण्यात ५०० रुपयात पर्यटन

**पुणे** : पीएमपीच्या पुणे स्थानक-रांजणगाव या पर्यटन बससेवेला रविवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी २४ पर्यटकांनी सफर केली. या सेवेसाठी प्रतिप्रवासी पाचशे रुपये एवढा दर असून, प्रत्येक शनिवार आणि रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ही सेवा सुरू राहणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरानजीकच्या धार्मिक आणि पर्यटन स्थळांसाठी पीएमपीने सात मार्ग निश्चित केले आहेत. या मार्गांवर वातानुकुलित गाडीद्वारे प्रत्येक आठवड्याच्या शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सेवा दिली जात आहे.

### कारागृहात 'दादागिरी'; चार कैद्यांवर गुन्हा

**पुणे** : येरवडा कारागृहात पुन्हा कैद्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडली. कारागृहातील वर्चस्वातून कैद्यांच्या दोन गटात हाणामारी झाल्याची घटना नुकतीच घडली होती. या प्रकरणी प्रकाश विठ्ठल रेणुसे, विकास बाळासाहेब कांबळे, वैभव थिटे, तेजस बाळासाहेब बच्छाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येरवडा कारागृहातील सीजे विभागात पाण्याच्या हौदाजवळ कैदी रेणुसे, कांबळे, थिटे, बच्छाव यांचा सुजीत टाक याच्याशी वाद झाला. या कारणावरुन रेणुसे, कांबळे, थिटे, बच्छाव यांनी टाक याला शिवीगाळ करुन त्याला प्लास्टिकच्या बादलीने मारहाण केली.

### ड्रग्सच्या व्यसनाने तरुणाची आत्महत्या

**नागपूर** : ड्रग्स घेण्याची सवय लागल्यानंतर ते मिळविण्यासाठी कोणत्याही स्तराला जाणाऱ्या युवकाने स्वत:चे जीवन संपवले. ही दुर्दैवी घटना विश्व अंमली पदार्थ विरोधी दिवसाच्या पहाटेलाच घडली. अन्नू गुप्ता (२४) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. बारावी झाल्यानंतर तो वडिलांच्या व्यवसायात हातभार लावत होता. त्याला ड्रग्स आणि दारुचे व्यसन लागले. तो ड्रग्स मिळविण्यासाठी पैसे खर्च करीत होता. कुटुंबियांनी त्याला सुधारण्यासाठी प्रयत्न केले. मात्र ड्रग्स मिळत नसल्याने तो नैराश्यात गेला. अन्नूने रविवारच्या एक वाजता घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

### सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात महिला अडकली

**नागपूर** : चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची ३७ लाख ४८ हजार रुपयांनी फसवणूक केली. अलिकडे सायबर गुन्हेगार व्हॉट्‌ॲपवर मॅसेज पाठवून युट्यूब वरील व्हिडिओला लाईक करण्यास सांगतात. त्याच्या बदल्यात चांगला परतावाही देतात. महिनाभर चांगला आर्थिक फायदाही मिळतो. पुढचा व्यक्ती जाळ्यात अडकल्याचे लक्षात येताच त्याला मोठे टार्गेट देऊन लाखो रुपयाची गुंतवणूक करण्यास सांगतात आणि येथेच लोकांची फसवणूक होते.

### कुलगुरुंच्या दालनात भाजपा आमदाराचे आंदोलन

**नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या दालनात भाजपचे आमदार प्रवीण दटके, माजी महापौर संदीप जोशी व भारतीय जनता युवा मोर्चाच्या सदस्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. विद्यापीठातील कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना कुठलीही सूचना न देता कामावरून काढून टाकण्यात आल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन केले जात आहे. विशेष म्हणजे कुलगुरू चौधरी हे विद्यापीठ शिक्षण मंचाच्या म्हणजे भाजप परिवाराच्या जवळचे आहेत. असे असतानाही त्यांच्याविरोधात भाजप आक्रमक झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### नराधम शिक्षकाचा विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार

**नागपूर** : एका शिक्षकाने विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी वॉटर पार्कमध्ये सहलीचे आयोजन केले. परत आल्यानंतर एका विद्यार्थिनीला पार्टी आणि भेटवस्तू देण्याच्या निमित्ताने हॉटेलमध्ये बोलावले. तेथे एका रुममध्ये नेऊन तिच्याशी अश्लील चाळे करून लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. भेदरलेल्या अवस्थेत विद्यार्थिनी हॉटेलखाली पळत आली. तिने आरडाओरड केली. घडलेला प्रकार सांगितला. नागरिकांनी त्या शिक्षकाला यथेच्छ बदडले. या प्रकरणी पोलिसांनी अजयकुमार गंगाराम प्रसाद (३२, रा. छावणी, सदर) या शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करुन अटक आहे.

### गोवंश तस्करीच्या संशयातून तरुणाची हत्या

**नाशिक** : इगतपुरी तालुक्यात गोमांस तस्करीच्या संशयावरून काही जणांनी तरुणाची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हाणामारीत दुसरा तरुणही गंभीर जखमी आहे. पोलिसांनी याप्रकरणी १० जणांना ताब्यात घेतले.

### ब्रिजभूषण सिंह विरोधातील कुस्तीपटूंचे आंदोलन मागे

**नवी दिल्ली** : कुस्तीगीर महासंघाचे मावळते अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचा आरोप केला होता. याप्रकरणात ब्रिजभूषण सिंह यांच्या अटकेच्या मागणी करत गेल्या ५ महिन्यांपासून कुस्तीपटूंचं आंदोलन सुरु होतं. पण, न्यायालयात चार्जशीट दाखल झाल्याने रस्त्यावरील लढाई थांबवण्याचा निर्णय कुस्तीपटूंनी घेतला आहे.

याबाबत कुस्तीपटू साक्षी मलिकने माहिती दिली आहे. ट्वीट करत साक्षी मलिक म्हणाली की, 'कुस्तीपटूंची ७ जूनला सरकारबरोबर बैठक झाली. या बैठकीत सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार लैंगिक शोषण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. दिल्ली पोलिसांनी तपास पूर्ण करत १५ जूनला चार्जशीट दाखल केलं आहे. त्यामुळे न्याय मिळेपर्यंत कुस्तीपटूंची रस्त्यावरील लढाई आता न्यायालयात सुरु राहील.'

# जगभरात मोदींचाच डंका!

## लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पहिले स्थान

सुराज्य/नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा डंका जगभरात वाजतो आहे असंच आता पुन्हा एकदा म्हणावं लागेल. लोकसभा निवडणुका जवळ येत असताना मोदींसाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नेतृत्व आवडणाऱ्या प्रत्येकासाठी ही आनंदाची बातमी आहे. जगप्रसिद्ध नेत्यांपैकी सर्वात प्रसिद्ध नेते म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रथम क्रमांकावर आहेत.** World Of Statistics **या ट्विटर हँडलने याविषयीची आकडेवारी दिली आहे. क्रमांक एकचे नेते म्हणून ७६ टक्के रेटिंगसह पंतप्रधान नरेंद्र मोदींना पसंती देण्यात आली आहे.**



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ट्विटरवर ८९.५ मिलियन ऑफोअर्स आहेत. जगातले सर्वात लोकप्रिय नेते असा त्यांचा लौकिक आहे. काही तज्ज्ञांचं असं म्हणणं आहे की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी जी 'मन की बात' करतात, त्यामुळे त्यांची लोकप्रियता इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे. सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात रेडिओ हा आऊटडेटेड वाटत असला तरीही त्यावरुन मोदी संवाद साधतात. ही बाब अनेकांना भावली आहे, त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत भर पडली आहे. या माध्यमातून लोकांशी संवाद साधणं हे लोकांना भावलं आहे. प्रत्येक 'मन की बात' हे भाषांतरित केलं जातं. ते राष्ट्रीय स्तरावर आणि जागतिक स्तरावर ऐकलं जातं.

World of Statistics या ट्विटर हँडलने दिलेल्या माहितीनुसार ७६ टक्के लोकांनी मोदींना सर्वात लोकप्रिय नेते म्हणून पसंती दिली आहे. ७६ टक्के हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं रेटिंग आहे. लोकप्रिय नेत्यांच्या यादीत जो बायडेन यांच्या लोकप्रियतेच्या रेटिंगचं प्रमाण ४० टक्के आहे. तर ऋषी सुनक यांच्या लोकप्रियतेचं रेटिंग प्रमाण ३१ टक्के आहे. सगळ्याच प्रसिद्ध नेत्यांची यादी या ट्विटर हँडलने पोस्ट केली आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिल्या स्थानी आहेत.

### याआधीही मोदीच क्रमांक एकवर

ऑगस्ट २०२२ मध्येही अशाच पद्धतीचा एक सर्व्हे करण्यात आला होता. त्यावेळीही भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीच क्रमांक एकवर होते. ७५ टक्के रेटिंगसह त्यांना सर्वाधिक लोकप्रिय नेते म्हणून पसंती दर्शवली होती. मॉर्निंग कंसल्टने ही टक्केवारी सादर केली होती.

# हिंमत असेल तर तोडा नाहीतर तुम्हालाच तोडतो

### शिवसेनेच्या शाखेवरून परबांची उघडउघड धमकी

सुराज्य/मुंबई



वांद्रे पूर्व येथील शिवसेनेच्या ४४ वर्षे जुन्या शाखेवर मुंबई पालिकेने नुकताच बुलडोझर चालवला. उद्धव ठाकरेंचे निवासस्थानात मातोश्रीपासून हाकेच्या अंतरावर असणारी ही शाखा ठाकरे गटाच्या ताब्यात होती. बीएमसीने शिवसेनेची ही शाखा अनधिकृत असल्यामुळेच कारवाई करण्यात आल्याचे म्हटले होते. पण बीएमसीच्या या कारवाईवरुन ठाकरे गटाचे नेते व आमदार अनिल परब यांनी कारवाई करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यालाच सज्जड दम भरला. ठाकरे गटाकडून मुंबई पालिकेच्या वॉर्ड ऑफिसवर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी अनिल परब उपस्थित लोकांना मार्गदर्शन करत होते.


अनिल परब म्हणाले की, 'सध्याचे शिंदे सरकार सांगतात, बाळासाहेबांचा विचार घेऊन, वारसा घेऊन आम्ही पुढे चाललो आहे आणि त्याच शिंदे सरकारने बाळासाहेबांचा फोटो आणि छत्रपत्री शिवाजी महाराजांची मूर्ती असलेल्या शाखेवर कारवाई केली. आमच्या महिला कार्यकर्त्यांनी शाखेतील मूर्ती बाहेर काढण्याची विनंती केली. परंतु त्यांच्या विनंतीला मान दिला नाही. मला तो अधिकारी बघायचा आहे, कोण तो दीड शहाणा ज्याने आमच्या शाखेला हात लावला त्याचा काय बंदोबस्त करायचा तो करून घेऊ, अशी जाहीर धमकी अनिल परब यांनी दिली.

अनिल परब म्हणाले की, 'बाळासाहेबांचा फोटो, महाराजांची मूर्ती आतमध्ये असताना शिवसेनेची शाखा तोडली जाते. आता बघायचं आहे शिंदे सरकार त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करते. माझं शिंदे सरकारला आवाहन आहे, हिंमत असेल तर कारवाई करून दाखवा, नाहीतर बाळासाहेबांचं नाव घेणं बंद करून टाका. सरकारला एवढी मस्ती की, एक कोणतरी कार्यकर्ता उठतो, शिवसेनेच्या शाखेची तक्रार करतो आणि त्यानंतर महाराजांची मूर्ती आणि बाळासाहेबांचा फोटो असलेली शाखा तोडली जाते. हे तर आता आपण कधीच सहन करू शकत नाही.'

यावेळी परब म्हणाले की, इतक्या दिवसात कोणाची हिंमत झाली नव्हती. पण या गद्दार सरकारला असे वाटू लागले की, कुणी फालतु कार्यकर्ता उठतो आणि तक्रार करतो. त्यानंतर महानगर पालिकेचे लोकं शाखेवर कारवाई करतात. उद्यापासून त्या अधिकाऱ्याची कॉलर पकडून फिरवतो वांद्रे विभागात आणि दाखवतो कुठे-कुठे अनधिकृत बांधकामं झाली आहेत. हिंमत असेल तर तोडा नाहीतर तुम्हालाच तोडतो, अशी धमकी अनिल परब यांनी दिली.

# वडाप-ट्रेलरचा भीषण अपघात; ८ जणांचा मृत्यू; ७ जखमी

सुराज्य/दापोली



रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात हर्णे मार्गावर आसूद जोशी बागेजवळ रविवारी (२५ जून) संध्याकाळी भीषण अपघात झाला. ट्रेलरने वडाप गाडीला जोरदार धडक दिली. या अपघातात बापलेकीसह आठ जणांचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रेलर चालकाने जंगलामध्ये पळ काढला.

मिळालेल्या माहितीनुसार, 'बांधकाम साहित्य रिकामं करुन ट्रेलर दापोलीच्या दिशेने जात होता, तर वडाप गाडी १४ प्रवाशांना घेऊन हर्णेच्या दिशेने जात होती. दोन्ही गाड्या जोशी बागेजवळील अवघड वळणावर आल्या. यावेळी ट्रेलरने बाहेरुन वळण घेतल्यामुळे वडापला पुढे जाण्यासाठी रस्ताच राहिला नाही. याचवेळी ट्रेलरने या गाडीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला.

या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २ जण गंभीर जखमी आहेत. अपघातातील सर्व जण दापोली तालुक्यातील अंजरले, अडखळ, पाजपंढरी या गावातील प्रवासी असल्याचे समजते.

# अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रवींद्र शोभणे

सुराज्य/पुणे




साने गुरुजी यांची कर्मभूमी असलेल्या अमळनेर येथे अ. भा. मराठी साहित्य महामंडळाने आयोजित केलेल्या ९७ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कथाकार डॉ. रवींद्र शोभणे यांची निवड करण्यात आली आहे. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

तांबे यांच्या अध्यक्षतेत अ. भा. मराठी साहित्य महामंडळाची बैठक रविवारी पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यालयात पार पडली. यामध्ये विविध घटक संस्थांकडून आलेल्या प्रस्तावित नावांवर चर्चा करण्यात आली. त्यातून डॉ. शोभणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

या बैठकीला महामंडळाच्या कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, उपाध्यक्ष रमेश वंसकर, 'मसाप' चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. संमेलन येत्या २ ते ४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अमळनेर येथील प्रताप विद्यालयाच्या पटांगणावर होणार आहे.

# गुजरात सेमीकंडक्टरचे हब बनणार?

### पंतप्रधान मोदींच्या अमेरिका दौऱ्यात दोन मोठ्या कंपन्यांची गुंतवणूक



**सुराज्य/नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात दोन महत्त्वाचे प्रकल्प गुजरातमध्ये येणार हे स्पष्ट झालं आहे. सेमी कंडक्टर क्षेत्रातील बलाढ्य कंपनी मायक्रॉननं आपला प्रकल्प गुजरातमध्ये येणार असल्याचं जाहीर केलं आहे. त्यावरून काही आरोप प्रत्यारोपही होत आहेत.

गुजरात देशात सेमीकंडक्टरचं हब बनणार का? पंतप्रधान मोदींच्या अमेरिका दौऱ्यात झालेल्या एका करारानं याची चर्चा सुरु झाली आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रातली बलाढ्य कंपनी मायक्रॉन ही गुजरातमध्ये २२ हजार ५४० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. ५ हजार थेट रोजगार आणि पुढच्या काही वर्षात १५ हजार अप्रत्यक्ष रोजगार त्यातून उपलब्ध होतील, असा दावा केला जात आहे. वेदांत, फॉक्सकॉन पाठोपाठ सेमीकंडक्टर निर्मितीतला हा महत्वाचा प्रकल्प गुजरातमध्ये असेल.

पंतप्रधान मोदींच्या अमेरिका दौऱ्याचं निमित्त साधूनच ही मोठी घोषणा मायक्रॉन कंपनीनं केली आहे. सेमीकंडक्टर निर्मितीत भारताला सक्षम बनवण्याच्या दृष्टीनं हे मोठं पाऊल असेल, असं केंद्राच्यावतीनं सांगितलं जात आहे. पण मायक्रॉन ही अमेरिकन कंपनी सेमीकंडक्टर भारतात बनवणार नाही, तर इथं जुळणी, चाचणी आणि पॅकेजिंग युनिट स्थापन करणार आहे.

चीन आणि तैवान हे दोन देश सेमीकंडक्टर उत्पादनात आघाडीवर आहेत. सेमीकंडक्टर उत्पादनात चीनचा वाटा ३८ टक्के तर तैवानचा २७ टक्के इतका आहे. ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठीच वेगवेगळ्या पद्धतीनं सेमीकंडक्टरचं उत्पादन भारतात वाढवण्याचे प्रयत्न आहेत. त्यामुळेच उत्पादन नसलं तरी किमान पॅकेजिंग, असेम्बलिंगनं तरी मायक्रॉननं आपलं भारतात अस्तित्व दाखवावं यासाठी ही करार महत्वाचा आहे. पण यात कंपनीचा प्रत्यक्ष वाटा कमी आणि केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार २० टक्के वाटा उचलणार असल्यानं प्रत्यक्षात करदात्यांचाच पैसा लागणार असल्याची टीका काँग्रेसनं केली आहे.

# राहुलचा प्लॅन ऐकून पोलीसही चक्रावले

सुराज्य/पुणे

पुण्यातील एमपीएससी टॉपर दर्शना पवारच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्राला हादरा बसला आहे. दर्शनाच्या हत्येने फक्त पुणेच नाही तर राज्यात एकच खळबळ माजली. MPSC परीक्षेत अव्वल कामगिरी करणाऱ्या दर्शना पवारचा मृतदेह १८ जूनला राजगडाच्या पायथ्याशी आढळून आला आणि सगळेच हादरले. त्यानंतर पोलिसांनी मोठ्या शिताफीने कामगिरी करत दर्शनाचा मारेकरी असलेल्या राहुल हंडोरेला मुंबईतून अटक केली. त्याने दर्शनाची हत्या केल्याची कबुलीही दिली आहे. दर्शनाचा खून केल्यानंतर राहुलचा नेमका प्लान काय होता, याची माहिती त्याने पोलिसांनी दिली. त्याचा जबाब एकून पोलिसांनाही आश्चर्य वाटलं.

**पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न**

दर्शनाची हत्या केल्यानंतर राहुल फरार झाला होता. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी त्याने पुण्यातून पळ काढला, तो वेगवेगळ्या शहरात फिरत राहिला. यादरम्यान त्याने रेल्वेने प्रवास केला. पुण्यातून तो सर्वात आधी सांगलीत गेला. त्यानंतर तेथून त्याने गोवा गाठलं. त्यानंतर तो थेट चंदीगडला पोहोचला. त्यानंतर तो पश्चिम बंगालमधील हावडा येथे गेला.



दर्शना हत्या प्रकरण

यावेळी राहुलने पोलिसांपासून कसं लपायचं याची सारी तयारी केली होती. त्याने त्याचा मोबाईल पूर्णवेळ बंद ठेवला होता, जेणेकरुन पोलिसांना त्याच्या लोकेशनची माहिती मिळू नये.

**सहप्रवाशांच्या फोनवरुन नातेवाईकांना फोन**

तो प्रवासात सहप्रवाशांच्या फोनवरुन तो कुटुंबीयांना आणि नातेवाईकांना फोन करायचा. संपर्क झाल्यानंतर तो लगेच आपलं ठिकाण बदलायचा. जेणेकरुन पोलिसांना मिसलीड करता येईल आणि पोलिसांना त्याचं खरं लोकेशन कळणार नाही. एखाद्या शातिर गुन्हेगाराप्रमाणे त्याने हे सारं काही घडवून आणलं. सतत लोकेशन बदलत असल्याने तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता. पण, पोलीसही आपली सारी ताकद लावून त्याला शोधत होते, त्याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून होते. यातच पोलिसांच्या हाती एक टिप लागली आणि राहुलचा सारा खेळ संपला. राहुल हा मुंबईतील अंधेरी स्थानकावर येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरुन त्यांनी सापळा रचला आणि राहुलला अटक केली. राहुल हा अंधेरीवरुन पुण्याच्या दिशेने येणार होता. मात्र, तो पुन्हा एकदा निसटून जायच्या आधी पोलिसांनी त्याला पकडलं.

राहुल हंडोरेला अटक केल्यानंतर त्याला न्यायालयाने २९ जूनपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या चौकशीत राहुलने आपला गुन्हा कबुल केला आहे. राहुलवर वेल्हे पोलिसांनी भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करुन अधिकारी झाल्यानंतर दर्शनाने राहुलपासून अंतर केलं. राहुलने तिच्याकडे लग्नासाठी विचारलं, तर तिने लग्नालाही नकार दिला. यामुळे राहुलने तिला ट्रेकिंगच्या बहाण्याने सोबत नेलं आणि तिची हत्या केल्याची माहिती आहे. सध्या पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहे.

### कुख्यात गुन्हेगाराप्रमाणे सारा प्लान आखला

पोलिसांना आपली कुठल्याही प्रकारची माहिती मिळू नये, याची तो पूर्ण खबरदारी घेत होता. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणाने एखाद्या कुख्यात गुन्हेगाराप्रमाणे खून करुन पोलिसांना गुंगारा देण्याचा कट रचावा हे कोणालाच न पचणारं आहे, त्यामुळे त्याचा जबाब ऐकून पोलीसही चक्रावून गेले होते. दर्शनाचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तात्काळ या घटनेचा तपास सुरु केला होता. यावेळी पोलिसांनी तपासात अत्यंत गुप्तता बाळगली होती. पोलिसांनी तपासाची माहिती बाहेर फुटू दिली नाही. एकीकडे पोलीस राहुलचं लोकेशन ट्रेस करत होते, तर दुसरीकडे त्याच्या नातेवाईकांचीही चौकशी सुरु होती. तेव्हा कुटुंबीयांनी पोलिसांना राहुलच्या प्रवासाची माहिती दिली आणि पोलिसांच्या हाती महत्त्वाची माहिती लागली. पोलिसांना कसा गुंगारा देता येईल आणि त्यांचं लक्ष या प्रकरणावरुन विचलित करण्याचा त्याचा प्लान होता. इतकंच नाही तर हे प्रकरण समोर आल्यानंतर प्रवासात आपली ओळख पटू नये याचीही काळजी त्याने घेतली. तर, पोलिसांना आपलं लोकेशन सापडू नये, यासाठीही त्याने सारी प्लानिंग केली.






# ठाकुर बुवा येथे तिसरे गोल रिंगण

सुराज्य/महादेव जाधव

ज्ञानबा माऊली तुकाराम असा आकाशाला गवसणी घालणारा आवाज , टाळ मृदुंगाचा गजर, डौलाने फडकणाऱ्या भगव्या पताका, अश्वांच्या पायाखालची माती मस्तकी लावण्यासाठी उडालेली झुंबड, देहभान वय विसरून नाचणारे भाविक अशा भक्तिमय चैतन्य माऊलींच्या पालखीचे तिसरे गोल रिंगण ठाकूर बुवा येथे रंगले.

ठाकूरबुवा उघडेवाडी येथे झालेला हा रिंगण सोहळा व पाठ शिवीचा खेळ, लाखो वैष्णवांनी आपल्या नयनात साठवून ठेवला रिंगण सोहळा. परंपरेनुसार ऊन वारा सोसत शेकडो मैल प्रवास करत तिसऱ्या रिंगण सोहळ्यात सहभागी होऊन लाखो वैष्णवांनी हा रिंगण सोहळा आपल्याला साठवून आनंदमय सोहळा उपभोगला.

लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने २६ जून २०२३ रोजी सोमवारी तिसरे गोल रिंगण सोहळा ठाकूरबुवा उघडेवाडी येथे उत्साही व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

वेळापूर येथील मुक्कामानंतर सकाळी संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा पंढरीच्या पांडुरंगा भेटीसाठी जात असताना वेळापूरकरांचा निरोप घेऊन उघडेवाडी ठाकूरबुवा कडे प्रस्थान ठेवले. सकाळपासून उघडेवाडी, वेळापूर, तोंडले, बोंडले येथील ग्रामस्थांनी रिंगण सोहळा पाण्यासाठी मोठी गर्दी केली होती. ठाकूरबुवा उघडेवाडी हद्दीत परंपरेनुसार ठाकूरबुवाच्या प्रांगणात लाखो वैष्णवांच्या साक्षीने तिसरे गोल् रिंगण सोहळा उत्साहात पार पडला. पालखी सोहळ्याचा उघडेवाडी हद्दीत प्रवेश होताच उघडेवाडी सरपंच सौ जिजाबाई गवळी, उपसरपंच सौ सीमाली धनंजय साठे, ग्राम विकास अधिकारी पांडुरंग ठवरे, मानकरी नवनाथ बापू भगत, नागेश रामा कोळेकर, बाळकृष्ण भगवान व्यवहारे तसेच ग्रामपंचायत सदस्य कदम माधव खंडू, उघडे गिरीजा सयाजी, पवार संगीता सुरेश, नितीनकुमार बबनराव चौगुले, घोगरे महिंद्र महादेव, सरस्ते अंजली सागर ,उबाळे लक्ष्मी शिवाजी, काटकर सोनाली अशोक, संग्राम माने देशमुख, कोळेकर प्रतिभा पोपट, तसेच माजी उपसरपंच तानाजीराव जगदाळे, मोहन कचरे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक पांडुरंग कदम, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग सोलापूर जिल्हा अध्यक्ष डॉ. धनंजय साठे, हनुमंत सरस्ते, सतीश कदम, पोलीस पाटील दिपाली गोडसे, तलाठी पोगुलवार व उघडेवाडी ग्रामस्थ यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. यावेळी माऊलींचा अश्व व स्वराचा अश्व वारकरी मैदानात दाखल झाले त्यांच्या पाठोपाठ पताकाधारी व माऊलींच्या पालखीचे आठ वाजून २९ मिनिटांनी मैदानात आगमन झाले. बाळासाहेब चोपदार, राजाभाऊ चोपदार, उद्धव चोपदार यांनी रिंगण लावले. पालखी रथातून ठाकूरबुवा येथील स्वयंसेवक आणि उघडेवाडी ग्रामस्थ यांनी खांद्यावर घेऊन रिंगणाच्या मधोमध आणली. पताका धारी वारकऱ्यांनी पालखी भोवती गोल कडे करून उभे राहिले.

मुख्य रिंगण सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी चोपदाराने अश्वाला रिंगण दाखवले यानंतर अश्व दाखल झाला यावेळी माऊलींच्या घोषणांनी टाळ्यांनी आसमंत दणाणून गेला.

भोपळे दिंडीतील मानकऱ्याने जरीपटक्याचा ध्वज घेऊन रिंगणाला एक फेरी मारली. त्यानंतर स्वराचा अश्व पुढे व त्या पाठोपाठ माऊलींचा अश्व काही क्षणात दोन्ही अश्विनी दोन फेऱ्या पूर्ण करून लाखो भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले ८. वा.४० मिनीटांनी रिंगण सोहळा पुर्ण झाला. यावेळी अश्वांच्या पायाखालची माती मस्तकी लावण्यासाठी वैष्णवांनी, भाविकांनी एकच झुंबड उडाली होती. रिंगण सोहळ्यानंतर फुगड्या यासह पारंपारिक खेळ खेळण्यात महिला व पुरुष वारकरी देहभान विसरून मग्न झाले तर अनेक वारकऱ्यांनी रिंगण तळावरच न्याहारी केली.

रिंगण सोहळ्याचा आनंद डोळ्यात साठवून विठ्ठलाच्या दर्शनाची आस मनात ठेवून भेटीचे ओढीने हा भक्तांचा महापूर बोंडले गावा कडे मार्गस्थ झाला. पोलीस खात्याच्या वतीने बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. सदर रिंगण सोहळा पार पाडण्यासाठी ठाकूर बुवा येथील स्वयंसेवकांनी तसेच उघडेवाडी ग्रामपंचायत कर्मचारी सदा साठे व अतुल उबाळे यांनी सहकार्य केले.



ठाकूर बुवा उघडेवाडी येथील तिसरे गोल रिंगण सोहळा. (छायाचित्र-महादेव जाधव वेळापूर)





## बोंडले येथे श्री.संत तुकारामांचा धावा

### श्री.संत तुकाराम महाराज व श्री.संत सोपानकाकांच्या पालखीची संत भेट

सुराज्य/वेळापूर

संतश्रेष्ठ जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात महत्वाचा समजला जाणारा धावा बोंडले (ता. माळशिरस) येथील उजनी कालव्याच्या उतारावरती मोठ्या उत्साहात पार पडला. बोंडले येथील उजनी कालव्याच्या टेकडीवर पालखी सोहळा आल्यानंतर धावा होणार त्या ठिकाणी पालखी सोहळा थांबविण्यात आला. सोहळा प्रमुख व चोपदर पुढे आले त्यांनी दिंड्या लावल्यानंतर

**//तुका म्हणे धावा//**
**//आहे पंढरी विसावा//**

हा अभंग झाल्यानंतर पांडुरंगाच्या भेटी साठी आतुर झालेल्या लाखो वारकऱ्यांनी टाळ मृदुगांच्या जयघोषात भक्तिमय व अत्यंत आनंदी वातावरणात वाऱ्याच्या वेगाने देहभान विसरून पंढरीच्या ओढीने या उतारावरुन बोंडले गावाच्या दिशेने धाव घेतली.

यानंतर दुपारच्या विसाव्यासाठी विसावली. बोंडले चौक येथे श्री.संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यास तोफांची सलामी देऊन पालखी सोहळा प्रमुखांना श्रीफळ फेटा देऊन मोठया उत्साहात सोहळ्याचे बोंडले सरपंच विजयसिंह बाळकृष्ण माने देशमुख ,ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यावतिने स्वागत करण्यात आले.

दरम्यान बोंडले येथे श्री.संत तुकाराम महाराजांची पालखी विसावल्यानंतर बोंडले मुक्कामी असलेला श्री.संत सोपानकाकांचा पालखी सोहळा पुढील प्रवासासाठी श्री.विठ्ठल-रुक्मणी मंदिरातून मार्गस्थ झाला. यावेळी श्री.संत सोपानकाकांच्या पालखीचा रथ व श्री.संत तुकाराम महाराजां पालखी रथा शेजारी आणून उभा करण्यात आला. यावेळी दोन्ही संतांच्या भेटी झाल्या. त्यानंतर दोन्ही पालखी सोहळा प्रमुखांनी एकमेकांना श्रीफळ देऊन भेट घेतली. यावेळी बोंडले येथे एकाचवेळी श्री.संत सोपानकाका, श्री.संत तुकाराम महाराज व श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील लाखो वारकरी एकत्र आल्यामुळे टाळ मृदुंगाच्या व माऊली, तुकारामांच्या जयघोषामुळे आसमंत दुमदुमला होता. व येथून पुढे श्री.संत ज्ञानेश्वर महाराज, श्री.संत सोपानकाका व श्री.संत तुकाराम महाराज यांचे पालखी सोहळे एकत्र एकाच मार्गाने पुढील मुक्कामी मार्गस्थ झाले.

संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा बोंडले कडे मार्गस्थ ठाकूर बुवा उघडेवाडी येथे संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्याचे तिसरे गोल रिंगण पार पडून पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी आसुसलेल्या वैष्णवांनी पुढे पाऊल टाकून पालखी सोहळा उजनी कॅनालच्या खाली धावाच्या ठिकाणी आल्यानंतर टाळ मृदंगाचा जयघोष करीत मुखातून माऊलींचे नाव घेत लाखो वारकऱ्यांनी वेगाने पंढरीच्या नाथाच्या ओढीसाठी धाव घेतलीसंत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा बोंडले चौक येथे आल्यानंतर बोंडले सरपंच विजयसिंह बाळकृष्ण माने देशमुख आणि ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले यानंतर संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी सोहळा विसाव्यासाठी विसावला. बोंडले ग्रामस्थ यांनी पादुका पालखी खांद्यावर घेऊन ज्ञानेश्वर माऊलींचा जयघोष करत नंदाच्या ओढ्यावर आणले तेथे ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना स्नान घालण्यात आले व त्यानंतर पादुका पालखी तोंडले ग्रामस्थांनी खांद्यावरून तोंडले गावात नेण्यात आली. तोंडले गावात पालखीचे जोरदार स्वागत करण्यात आले.



माळशिरस तालुक्यातील मांडवे पाटी याठिकाणी पालखी आल्यावर माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते यांनी पालखीचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. पालखीचे स्वागत केल्यानंतर पालखीतील वडीलधाऱ्या वारकऱ्यांचे त्यांनी व त्यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनी पाय दाबुन सेवा केली. तसेच सर्व वारकऱ्यांना स्वतः नाष्टा व चहा दिला .

## हरिनामाच्या गजराने अवघी दुमदुमली पिलीव नगरी

सुराज्य/संजय पाटील

आषाढी वारी निमित्त पंढरपूर कडे पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांचा सोलापूर-सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवरील माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मुक्कामास असणाऱ्या अनेक पालख्यांचे स्वागत पिलीव घाटात सरपंच नितीन मोहिते माळी,उपसरपंच सोनाली करमाळकर ,ग्रामविकास अधिकारी अनिल सावळजकर,ग्रामपंचायत सदस्य, राजकिय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार यांनी भक्तीमय वातावरणात केले.

यामध्ये प्रामुख्याने संत सेवागिरी महाराज ,ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज ,गोरक्षनाथ पालखी सोहळा, गाडगे महाराज ,शेकोबा दादा गोजेगाव,इंचगिरी संप्रदाय, श्रीहरी पायी दिंडी सोहळा बोरखळ , अशा अनेक छोट्या-मोठ्या पालख्या पंढरपूर कडे जाताना माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मुक्कामास असतात.मुक्कामाच्या ठिकाणी प्रवचने ,हरिपाठ, भारुड ,भजन ,कीर्तन या माध्यमातून प्रबोधन करताना विठ्ठल भक्ती अंधश्रद्धा निर्मूलन व्यसनमुक्ती प्रबोधन जातीपाती किंवा जाती जातीत स्पर्श अस्पृश्य असा भेदभाव न पाळता सर्व मानव जात समान असल्याचे आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करीत असतात.



५९ वर्षांहून अधिक काळ अनेक दिवसाची परंपरा जपत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या पालखीचे स्वागत स्वागत अत्यंत उत्साही व भक्तिमय वातावरणात ग्रामपंचायत सदस्य अनिता जेऊरकर ,विजय नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक अविनाश जेऊरकर व जेऊरकर कुटुंबीयांच्या वतीने सर्व संतांचे संत पूजन करून या पायी वारी दिंडीत योगदान दिलेल्या व्यवस्थापक बैलगाडी चालक-मालक चोपदार तुळशी वृंदावन धारक महिला व प्रमुख मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

मुक्कामाच्या ठिकाणी व कित्येक विठ्ठल भक्तांनी आपापल्या घरी नेऊन वारकऱ्यांचा संतपूजन करून अन्नदान देऊन संत पूजन करून सन्मान केला .यामध्ये माजी चेअरमन रामचंद्र कोळी ,विजय पतसंस्थेचे चेअरमन हनुमंत कोळी, विमा प्रतिनिधी दत्तोपंत भैस, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष कुमार भैस ,महालक्ष्मी देवीचे पुजारी शिवाजी शेंडगे ॲड.मानसिंह जहागिरदार,ॲड.वैभव मेथवडे,विजय माळी,शशिकांत लोखंडे, ब्रह्मदेव लोखंडे आदि विठ्ठल भक्तानी अन्नदान केले. दुसऱ्या दिवशी सकाळी चालक मालक विविध संस्था संघटना दुकानदार यांनी मंडप टाकून वारकऱ्यांना,अल्पोपहार,बिसलेरी पाण्याच्या बाटल्या देऊन निरोप दिला.सचिन वाघमारे मित्र परीवाराने ब्रम्हचैतन्य गोंदावलेकर महाराज यांच्या पालखींतील वारकऱ्यांना फराळ व बिसलीरीचे वाटप केले.

## संत वामनभाऊ महाराज पालखी अरण मुक्कामी

सुराज्य/मोडनिंब

श्री गहिनीनाथ गडावरील संत वामनभाऊ महाराज यांचा पायी वारी पालखी सोहळा आज अरणमधे सावतामहाराज मंदिरात दाखल झाला. आज या सोहळ्याचा अरणमधे विसावा आहे. या सोहळा प्रमुख श्री विठ्ठल महाराज यांच्या नेतृत्वाखाली सुमारे सोळा हजार वारकरी दिंड्या व पालख्यां यांच्या सह २५० वाहने यामध्ये पंढरपूरला आषाढी वारीला निघाले आहेत.

आज अरणमधे या सोहळ्यतील वारकऱ्यांच्या जेवणाची सोय पुणे पिंपरी चिंचवड येथील भाविक राजेंद्र दगडु भोंडवे, प्रविण शिवराम भोंडवे, सुनील काशिनाथ भोंडवे यांनी केली होती.यावेळी अरण येथील अभिमान पाटील यांच्या कडून अन्न दान म्हणून महाप्रसादाचे लाडू वाटप करण्यात आले.



## भूसंपादनात अडकलेल्या ठिकाणी शिवरत्न कन्स्ट्रक्शनने केली पर्यायी व्यवस्था

सुराज्य/अकलूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतील संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अतिशय वेगात सुरू असून या मार्गावरील अकलूज ते बोंडले दरम्यान शिवरत्न कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या दर्जेदार कामाचे व भूसंपादनात अडकलेल्या ठिकाणी केलेल्या उत्तम पर्यायी मार्गाबाबत वारकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

भूसंपादनातील दिरंगाईमुळे माळशिरस तालुक्यातून जाणाऱ्या संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम रखडल्याबाबतचे वृत्त नुकतेच विविध वर्तमानात प्रसिध्द झाले होते. परंतु भूसंपादन रखडले असले तरी पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना तसेच संत तुकारामांच्या पालखीला कसलाही त्रास होणार नाही किंवा कोणतीही अडचण येणार नाही यासाठी शिवरत्न कन्स्ट्रक्शनचे



चेअरमन किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील व शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह अहोरात्र मेहनत घेऊन मार्गातील सर्व अडथळे दूर करत दर्जेदार रस्ता उपलब्ध करून दिला होता.

दि. २४ जून रोजी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात पर्यायाने माळशिरस तालुक्यात आगमन झाले. शिवरत्न कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने भव्य कमानी उभारून तसेच फटाक्यांची आतिषबाजी व पुष्पवृष्टी करत पालखीचे व वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी वारकऱ्यांना मोफत अल्पोपहार चे वाटप केले.

## भक्तीच्या मळ्यात हल्ली राजकीय जत्राही भरतेय...

सुराज्य/पुरूषोत्तम कुलकर्णी

**पंढरपूरच्या आषाढी आणि कार्तिकी एकादशीला वैष्णवांची मांदियाळी जमण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. श्री विठुराया म्हणजे साक्षात लोकदेवता. इथे सोवळे-ओवळे काहीच नाही. ही देवता म्हणजे समतेचे प्रतिकच. मुखदर्शन-चरणस्पर्श सर्वांना मुक्त. सावळ्या विठुलाच्या दरबारात जमणाऱ्या वारकऱ्यांमध्ये जात-पंथ-धर्म-उच्च-नीच हा भेदभाव बिलकूल नसतो. पंढरीत कायम भक्तीचा मळा असतो पण अलिकडच्या काही वर्षांमध्ये ऐन वारीत राजकीय जत्राही भरू लागली आहे.हा पंढरीचा राजा राजकारण्यांनाही सामावून घेत आहे हे विशेष. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांप्रमाणे इतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही श्री पांडुरंगाचे आकर्षण वाढू लागले आहे.**

### नव्या मुख्यमंत्र्यांची भर...

श्रीविठ्ठलाच्या महापूजेसाठी यंदा एका नव्या मुख्यमंत्र्यांची भर पडली आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव (केसीआर) व त्यांच्या मंत्रीमंडळातील अनेक मंत्री मंगळवारी पंढरीत दाखल होतायेत. मंगळवारी दर्शन सोहळा झाल्यानंतर हा लवाजामा परतणार आहे. दरम्यान राव यांनी वारीच्या तोंडावर स्वार्थ आणि परमार्थ साधण्याचा डाव साधला आहे.त्यांचा बीआरएस हा पक्ष सोलापुरात विस्तार करू पहात आहे.त्यानिमित्ताने पंढरपूरचे युवा नेते भगिरथ भालके यांचा आज बीआरएसमध्ये प्रवेश होणार आहे.सरकोली येथे मेळावा भरवण्यात आला आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग यांनी सलग अकरावर्षे आषाढीच्या महापूजेला उपस्थिती दर्शवली.

### सारथ्यही करू लागले...

वारीसाठी पंढरीला येणाऱ्या पालखी सोहळ्यांमध्ये रथ असतो.त्या रथाचे सारथ्य करण्याची प्रथा राजकीय नेत्यांनी पाडली आहे.वाखरीपासून ते पंढरीपर्यंत दिंड्यासमवेत चालत येण्याची प्रथा माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी पाडली.युती सरकारमधील कामगार मंत्री स्व.साबीर शेख हे तर वारकरी आणि माळकरी.कपाळी गोपीचंदन व बुक्का लावून टाळ वाजवत दिंडीत ते सहभागी होत असत.नगरचे नेते बबनराव पाचपुते यांचाही दिंडीत कायम सहभाग असायचा.

एक काळ असा होता,वारी तीन लाखांपर्यंतच असायची.श्रीविठ्ठलाची महापूजा कधी व्हायची हेही राज्याला कळत नसत. राहुट्या उभ्या करून वारकरी मंडळी कुठेही दिवस-रात्र काढत असत. मंदिरातील पुजारी आणि बडवे मंडळीच आषाढी व कार्तिकी एकादशीची महापूजा उरकून येत असत.मात्र,परंपरेनुसार सारा महाराष्ट्र आजही एकादशीचा उपवास करत असतो.हा विठ्ठल भक्तीचा महिमा.जुना काळ गेला.आता बदल पहावा लागत आहे. आषाढीची वारी पंधरा लाखांपर्यंत गेली आहे.वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांची जबाबदारी प्रशासनावर येवून पडली आहे.पालकमंत्री-जिल्हाधिकारी हे सोयी सुविधांवर विशेष लक्ष देवून असतात.

विठ्ठल मंदिराचे सरकारीकरण झाल्यानंतर शासनाची मंदिर समिती स्थापन झाली. तेव्हापासून शासकीय महापूजेची प्रथा सुरू झाली.साधारण ८०-८५चा हा काळ असावा.तेव्हापासून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा करण्याची परंपरा सुरू



झाली.राज्यात काँग्रेसची अनेक वर्षे सत्ता होती.त्यामुळे काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांना महापूजेचा सर्वाधिक मान मिळाला.

पुढे १९९५ मध्ये राज्यात सत्तांतर होवून भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले.मनोहर जोशी हे युतीचे पहिले मुख्यमंत्री झाले तर उपमुख्यमंत्री भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंढे हे झाले.मंत्रीमंडळाचे निर्णय असोत वा जोशीसरांची प्रेस असो.त्यात आपल्यालाही मान मिळावा, असा गोपीनाथरावांचा आग्रह असे. पुढे काही दिवसांनी आषाढी एकादशीच्या महापूजेचा मान कोण घेणार? जोशीसर की गोपीनाथराव? मीडियाने हा प्रश्न बर्निंग केला. अंतिम निर्णयाचा चेंडू शिवसेनाप्रमुख व स्व.प्रमोद महाजन यांच्यापर्यंत गेला. आषाढीची महापूजा जोशीसर तर कार्तिकीची महापूजा गोपीनाथराव करतील,असा फार्म्युला काढला गेला.

शिवसेनाप्रमुख-महाजन यांच्या आदेशाला कुणाचे चॅलेंज नसे.युतीची सत्ता असेपर्यंत हाच फार्म्युला कायम राहिला.पुढे १९९९ मध्ये युतीची सत्ता गेली आणि काँग्रेस आघाडीचे सरकार आले.

मोठा पक्ष म्हणून काँग्रेसकडे मुख्यमंत्रीपद गेले आणि राष्ट्रवादीला उपमुख्यमंत्रीपद प्राप्त झाले. आघाडीच्या काळातही हाच प्रश्न निर्माण झाला. पण आघाडीच्या नेत्यांनी नसता वाद-विवाद न करता युतीचाच फार्म्युला पुढे सुरू ठेवला. त्यानुसार काँग्रेसचे मुख्यमंत्री आषाढीला तर राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री कार्तिकीला येत असत. आता शिंदे-फडणवीस सरकारने देखील तीच रित सुरू ठेवली आहे.